म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ..... वा. वा.
दा. क्र. ११६३४

IRBK-0111634

# स्वातंत्र्यवीर • सावरकर



# स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक :

प. ग. सहस्रबुद्धे

एम. ए. एल. एल. बी.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ११६३४ नों. दि ..........
वि. ...वा.वा.... क्र. ..................

IRBK-0111634

मूल्य दीड रुपाया

प्रथमावृत्ती : आक्टोबर १९६६

मुद्रक : व्ही. आर. बिरोडकर, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, खेतवाडी मेन रोड,
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगाव, मुं

३३०६

: १ :

८ जुलै १९१० या दिवशी सकाळी उगवत्या सूर्याने एक अद्भूत दृश्य पाहिले. युरोप खंडातील तो पहा फ्रान्स देश; आणि फ्रान्स देशातील ते मार्सेलिस बंदर. त्या बंदरात एक आगबोट उभी आहे. आगबोट थोडीशी बिघडली आहे, त्यामुळे बोटीवरचे सगळे वातावरण शांत आहे. बोटीवरचे उतारू, आणि काम करणारे आळसावले आहते.

तोच 'पकडा पकडा, कैदी पळाला!" अशी एकच आरोळी उठली. सगळी बोट जणू दचकली. "तो पहा, तो चालला आहे" असे म्हणून एका अधिकाऱ्याने उडी मारली.

कैदी सप सप हात मारीत होता, पाणी कापीत होता, पुढे जात होता. त्याचे अंग खूप खरचटले होते, रक्ताळले होते. समुद्राचे खारट पाणी खूप झोंबत होते. पण त्याला पर्वा नव्हती. शेवटी एकदाचा किनारा जवळ आला, "पण अरे! हा तर भा सुळका! हा चढायचा? थोडे त्या बाजूला जाऊ या."
न्हा कैदी पोहू लागला. पाठलाग करणारे जवळ येत होते.

धक्क्याचा हा भागही अगदी सरळच बांधलेला होता, त कैदी त्यावरून चढू लागला. एखाद्या घोरपडीसारखा तो भिंत चढला. तो आता फ्रान्सच्या किनाऱ्यावर आला हो त्याने एकदा मागे वळून पाहिले. ते पाठलाग करणारे ज येत होते. त्याने विचार केला, थांबून उपयोगी नाही.

तो पळत सुटला.

पाठलाग करणारेही किनाऱ्यावर आले. तेही त्याच्यामागे धावू लागले. तोंडाने ओरडू लागले,

"चोर! चोर! धरा, पकडा!"

कैदी पुढे पळत होता. तोच त्या कैद्याला एक फ्रेंच शिपाई दिसला आणि त्याला आनंद झाला. ते पाठलाग करणारे कोणी अधिकारी असतील तर ते त्यांच्या बोटीवर किंवा त्यांच्या इंग्लंड देशात. पण येथे फ्रान्सच्या जमिनीवर ते नुसते परदेशी होते. तेव्हा फ्रेंच शिपायासमोर ते काही एक गडबड करू शकणार नाहीत, आपल्याला परत नेऊ शकणार नाहीत, विचाराने त्या तेजस्वी तरुण कैद्याला बरे वाटले...आणि तो समोर दिसणाऱ्या फ्रेंच शिपायाजवळ गेला आणि त्याल म्हणाला, "मला पोलिस चौकीवर घेऊन चल."

तेवढ्यात पाठलाग करणारेही तेथे पोहोचले. दाम करं काम ही म्हण त्यांना चांगली माहीत होती. त्यांनी त्या फ्रेंच शिपायाच्या हातावर पैशाची पिशवी ओतली. फ्रेंच शिपाई

त्यांना वश झाला. कैद्याला त्या तिघा दैत्यांनी आपल्या ताब्यात घेतले आणि ओढत फरफटत घेऊन जाऊ लागले.

चालता चालता पहारेकऱ्याने त्याला एक ठोसा मारला आणि म्हटले, "पळून जात होतास काय? तुला आता पकडून बडवतो आणि तळघरातच डांबतो." असे म्हणून त्याने पुन्हा हात उचलला. पण तो तरुण कैदी चवताळलेल्या सिंहासारखा उसळला आणि म्हणाला, "हां, खबरदार माराल शिराल तर! आम्ही तर तळहातावर शिर घेऊनच घरून निघालो आहोत! तुम्ही मात्र सांभाळा! तशीच वेळ आली तर तुमच्यापैकी एकाचा तरी मी नक्कीच प्राण घेईन!"


त्याची आग ओकणारी नजर आणि बोलण्यातली धार पाहून ते इंग्रज अधिकारी चांगलेच चपापले. त्यांच्यापैकी एक जण हळूच दुसऱ्याच्या कानात म्हणाला, "बाबारे, नसत्या भानगडी उकरून काढू नकोस. हा म्हणजे साधारण माणूस नाही. हा क्रांतिकारकांचा राजा आहे. याने आणखी युक्ती दाखविली तर आपली केवढी पंचाईत होईल! देवाने कृपा केली म्हणूनच हा आपल्याला सापडला. नाहीतर निसटलाच होता. पण आता त्याला उगीच चिडवू नकोस—"

तो कैदी बोटीवर आला. त्याला तळघरात पुन्हा कोंडले गेले. त्याचा प्रयत्न फसला. त्याला पुढे वर्षानुवर्षे कष्टात काढावी लागली. पण तरीही त्या साहसामुळे त्याचे नाव जगभर

सुंदर

भारताचे दुःख जगाच्या वेशीवर टांगले गेले. भारत जिवंत आहे हे जगाला कळले. सळसळत्या रक्ताचे तरुण भारतवर्षात आहेत, हे जगाला कळले. अशी ती साहसी उडी मारणाऱ्या तेजस्वी तरुणाचे नाव होते.

विनायक दामोदर सावरकर.



तुझे पोवाडे गातील, पुढती तोफांचे चौघडे ।

## : २ :

नाशिक जिल्ह्यात चिमुकल्या दारणा नदीच्या किनाऱ्यावर भगूर नावाचे लहानसे गाव आहे. सावरकर या भगूरचे राहणारे. हे घराणे मूळचे कोकणातले. दोनशे वर्षांपूर्वी ते देशावर आले. पेशव्यांच्या काळात विद्वता आणि पराक्रम या दोन्हींनी या घराण्यातील पुरुषांनी लहानमोठी जबाबदारीची कामे केली होती. भगूरजवळ नदीपलिकडे असलेले राहुरी गाव सावरकर घराण्याला इनाम मिळालेले होते. महादेव आणि दामोदर दोघे भाऊ होते. महादेव मोठे होते. त्यांना बापूकाका म्हणत. महादेव आणि दामोदर यांचे आपसात पटत नसे. ते निरनिराळे रहात.

दामोदरपंत सावरकर मॅट्रिकपर्यंत शिकले होते. त्या गावात इंग्रजी शिक्षण घेतलेले ते एकटेच होते. त्यांना वाचनाची फार आवड होती. गावातील मंडळी त्याना फार मान देत. ती त्यांच्या घरी जमत. दामोदरपंत त्याना वर्तमानपत्रे वाचून दाखवीत. जगातल्या घडामोडी समजावून सांगत. दामोदरपंताना नुसता वाचनाचाच छंद नव्हता, तर ते कविताही करीत असत.

दामोदरपंतांचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव राधाबाई होते. ती कोठूरच्या मनोहरांची मुलगी होती. ती सुशील व प्रेमळ होती. तिचे काम स्वच्छ व टापटिपीचे असे. अडीअडचणीला ती सगळ्यांना मदत करीत असे. तिचे रूप सुंदर होते पण मन त्याहीपेक्षा सुंदर होते. दामोदरपंताचा

संसार तसा चांगला चालला होता पण एक दुःख होते. त्याना मूलबाळ नव्हते. दोन मुले झाली होती ती लवकरच वारली. पुढे राधाबाईनी काही व्रते केली. विशेषतः अष्टभुजा देवीची भक्ती केली. त्याना चार मुले झाली. गणेश उर्फ बाबा याचा जन्म १३ जून १८७९ रोजी झाला. दुसरा विनायक ऊर्फ तात्या. याचा जन्म सोमवार दिनांक २८ मे १८८३ रोजी झाला. तिसरी मैना ऊर्फ माई. तिचा जन्म १८८७ साली झाला आणि सर्वांत लहान नारायण ऊर्फ बाळ त्याचा जन्म १८९० साली झाला. देवीच्या कृपेनेच त्याना ही मुले लाभली असे राधाबाई समजत असत.

दिवस आणि रात्र आळीपाळीने येतात नि जातात. सुखदुःखांची जोडीही एका मागोमाग फिरत असते. सावरकरांच्या घरातही तसेच झाले. मुले आली आणि आई गेली. इसवी सन १८९२ साली राधाबाई वारल्या. गणेश हा वडील मुलगा त्यावेळी तेरा वर्षांचा होता, विनायक नऊ वर्षांचा होता, मैना पाच वर्षांची होती, आणि नारायण दोन वर्षांचा होता. मुले उघडी पडली. एक सुखी घर विसकटले.

राधाबाईच्या मृत्युमुळे दामोदरपंतास फार दुःख झाले. ते म्हणत, "ती साक्षात लक्ष्मी होती. ती गेली आणि तिच्याबरोबर या घरातील सगळे सुख गेले. आता घरात राहणेही नको !"

खरोखरच त्यानी आपले जुने घर सोडले. शेजारीच बांधलेल्या नव्या घरात ते मुलांना घेऊन राहू लागले. आईच्या प्रेमळपणाने ते मुलांचा सांभाळ करू लागले. त्यांचा

त्रिल घेऊ लागले. चांगल्या कविता समजावून सांगू लागले. विनायकाला काव्याची गोडी त्याच्या वडिलांनीच लावली.

विनायकाला मित्र होते. सगळ्यांचा तो आवडता होता. त्या बालवयात तो कविता लिहीत असे. गोपाळ देसाई नावाचा त्याचा एक वर्गबंधू होता; त्याचे अक्षर सुंदर होते. एका चांगल्या वहीत विनायकाच्या कविता हा देसाई मोठ्या काळजीने लिहून ठेवी. परशुराम शिंपी, राजाराम शिंपी हे तर जसे काही विनायकाचे भक्तच होते. ते मोठ्या आदराने विनायकाच्या कविता पाठ करीत.

ही सगळी मंडळी नुसती घरात बसून वाचन–लेखन करणारी नव्हती. ती मुले आखाड्यात जात असत. नदीवर पोहायला जात असत. वाळवंटात खेळत असत. आपसात दोन गट पाडून लढाईचा खेळ खेळणे त्यांना फार आवडे. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांच्या गोष्टी ती मन लावून ऐकत आणि एकमेकांना खुलवून सांगत.

: ३ :

दामोदरपंताना साहित्याची गोडी होती. ते विनायकाला मोठ्या प्रेमाने नवीन नवीन पुस्तके आणून देत. पुस्तक मिळाले की विनायक तहानभूक देखील विसरून जाई. चांगले चांगले उतारे तो पाठ करीत असे. त्या बालवयात मोरोपंताच्या शेकडो आर्या तो धडधडा म्हणून दाखवीत असे. रामायण



एकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रगटेल काली । विजयालक्ष्मी पावन

महाभारतातील सगळ्या लहानमोठ्या गोष्टी त्याला माहीत होत्या. चिपळूणकरांची संपूर्ण निबंधमाला त्याने वाचली होती.

कथा, कविता, इतिहास, निबंध आदी सगळ्या विषयांची पुस्तके तो आवडीने वाचीत असे. त्याच्या मनाला कोणतीही पुस्तके रुक्ष वाटत नसत. त्याच्या बुद्धीला कोणताही विषय कठिण वाटत नसे. विनायकाच्या वाचनाचा असा सपाटा चालू असता, एकदा त्याच्या हातात आरण्यके आली. जगप्रसिद्ध ग्रंथ ते !

विनायकाने लागलीच त्यांचे वाचन सुरू केले. त्यांतील उत्तम विचारांनी आणि गोड शब्दरचनेने विनायकाला अगदी मोहवून टाकले. त्याचे खेळणे, फिरणे बंद झाले. तीनतीनदा हाका माराव्या तेव्हा कुठे तो जेवा–खायला यायचा. चार दिवस झाले असे चालू होते. दामोदरपंताना मोठे कुतूहल वाटले. हा एवढे वाचतो आहे तरी काय म्हणून त्यांनी विनायकाच्या हातातील पुस्तक घेऊन पाहिले––आरण्यक ! !

त्यांच्या अंतःकरणात चर्र झाले. आपल्या येथे अशी समजूत आहे की आरण्यके घरात वाचणे चांगले नसते. ती अरण्यात लिहिली गेली आणि अरण्यातच वाचायची. परंतु विनायकाने ती घरात वाचली.

ते पाहून दामोदरपंतांच्या मनात विचार आला, " अरेरे ! माझ्या घराचे अरण्यच होणार की काय !... भरल्या संसारातून बायको निघून गेली आणि आता हा मुलगा आरण्यके वाचतो आहे ! पुढे काय होणार आहे कोण जाणे ! त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले.

: ४ :

स्त्रीशिवाय घराला घरपण येत नाही. दामोदरपंतानी गणेशचे लग्न करायचे ठरविले. त्याच्यासाठी ते मुली पाहू लागले. त्र्यंबकेश्वर येथील नानाराव फडके यांची पुतणी पसंत करण्यात आली. इसवी सन १८९६ च्या फेब्रुवारीमध्ये

त्र्यंबकेश्वरला हे लग्न झाले. सुनेचे नाव यशोदा ठेवण्यात आले. हीच यशोदा येसूवहिनी म्हणून प्रसिद्ध झाली. येसूवहिनी अगदी शांत स्वभावाच्या होत्या; खूप कष्टाळू; प्रेमळ आणि खेळकर होत्या. येसूवहिनींच्या रूपाने लहानग्या नारायणाला आई लाभली. विनायकाला, वेळी कान धरणारी तर वेळी गोड बोलून समजाविणारी, बहीण आणि मैत्रीण लाभली. गणेशाला सर्व प्रकारच्या परिस्थितीत धीराने साथ देणारी पत्नी लाभली. दामोदरपंताना नम्र, सेवातत्पर सून लाभली.

येसूवहिनी सावरकरांच्या घरात आली. जणू सुंदर चाफेकळी यज्ञकुंडावर वाहण्यात आली. येसूवहिनी सात्विक होती, स्नेहशील होती. स्नेहाने अग्नि अधिकच भडकतो. सावरकरांचे घर का घर होते ? छे ! ते स्वातंत्र्याचे यज्ञकुंडच होते ! अजून ते धधकले नव्हते इतकेच. येसूवहिनी म्हणजे यज्ञकुंडात ओतलेली गाईच्या शुद्ध तुपाची धारच जणू !

येसूवहिनींचे सगळे जीवन कष्टात आणि हालअपेष्टात गेले. अमूक एक प्रकारचा त्रास त्याना सहन करावा लागला नाही असे काही म्हणता येणार नाही. दारिद्र्य, पतिविरह, नातेवाईकांची घालूनपाडून बोलणी, सामाजिक छळ, अवहेलना, उपहास, सरकारच्या युक्त्या, धाकदपटशा, अंगावर धड कपडे नसणे, रहायला जागा नसणे, खाण्याची भ्रांत पडणे—आपल्या जीवनात हे सगळे प्रकार येसूवहिनींनी पाहिले. धीर गंभीरपणे तिने सर्व प्रसंगांना तोंड दिले. स्वतः तर खचली नाहीच पण

इतरांनाही तिने धैर्य दिले, स्फूर्ति दिली, ध्येयवाद शिकविला. म्हणूनच विनायक येसूवहिनींना कधीही विसरला नाही.



डॉ. मुंजे नि वीर सावरकर

: ५ :

गणेशला सगळेजण बाबा म्हणत असत. विनायकाला तात्या आणि नारायणाला बाळ अशी टोपण नावे होती. इंग्रजी शिक्षणासाठी बाबा नाशिकला रहात होते. तात्याचे भगूरच्या शाळेतील शिक्षण संपल्यावर दामोदरपंतानी वर्ष

दीडवर्ष त्याला घरीच ठेवले. पण त्याचा हुडपणा फारच वाढला. शेवटी त्यानी ठरविले की याला शाळेत अडकविले पाहिजे. त्याप्रमाणे एक दिवस ते तात्याला नाशिकला घेऊन गेले आणि त्याला बाबांच्या स्वाधीन केला.

बाबाला ह्या आपल्या भावाबद्दल अतिशय प्रेम वाटे. हा कोणीतरी मोठा होणार असे त्याना एकसारखे वाटत असे. ते तात्याच्या सगळ्या गोष्टींची अतिशय काळजी घेत. ते त्याला अगदी फुलासारखे जपत. त्याच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था ठेवीत. विनायक आखाड्यात जाऊ लागल्या-बरोबर बाबानी त्याच्यासाठी पौष्टिक खाद्याची विशेष व्यवस्था केली. नाशिकला आल्यावर पहिल्याप्रथम तात्याला विशेष मित्र नव्हते. शाळा, आखाडा आणि उरलेला सगळा वेळ वाचन असा त्याचा कार्यक्रम असे. बाबांचे मित्र जेव्हा जेव्हा बाबांकडे येत तेव्हा तेव्हा त्याना हा लहान मुलगा वाचनात गढलेलाच दिसायचा. ते त्याबद्दल त्याला चिडवू लागले. पुस्तकातील किडा म्हणू लागले. थट्टाविनोद करता करता अधिक बोलणे-बसणे होऊ लागले आणि मग विनायकाची खरी ओळख त्यांना पटू लागली. हळू हळू ते एकमेकांना म्हणू लागले—"हा मुलगा नुसतेच वाचीत नाही; वाचलेले समजतो, लक्षात ठेवतो आणि अनेक श्रेष्ठ तत्त्वे स्वतःच्या जीवनांत आणण्याची धडपड करतो. या मुलाच्या ठायी काहीतरी असाधारण तेज आहे!" थोड्याच दिवसांत ते तेज घराबाहेरही प्रगट होऊ लागले.

विनायक नववीत असल्यावेळची ही गोष्ट आहे. नाशिकला एक भाषणस्पर्धा झाली. विनायकाने तीत भाग घेतला आणि पहिल्या क्रमांकाचे बक्षीस मिळविले. त्याचे बोलणे ऐकून सर्व मंडळी चकित झाली. ती एकमेकांना म्हणू लागली, "काय वेग! केवढा आवेश! किती तर्कशुद्ध रचना आणि प्रत्येक वाक्याचे उच्चारण कसे धारदार होते! एक एक शब्द अगदी अंतःकरणाचा ठाव घेत होता. आपण अनेकांची भाषणे ऐकली पण बोलण्याचा असा सपाटा कधी पाहिला नव्हता बुवा! आणि वय किती कोवळे! खरोखर हे पाणी काही निराळेच आहे!"

: ६ :

प्रचंड घडामोडीचा तो काळ होता. देशातील वातावरण रोज बदलत होते, रोज तापत होते, भारताच्या मानगुटीला इंग्रजांचे राज्य अगदी घट्ट बसले होते. नुसते राज्य करण्याने त्यांचे जणू समाधान होत नव्हते. इथल्या लोकांना चिडवावे, लाजवावे असे त्यांना वाटत होते. इ. स. १८९७ साली व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव जगभर साजरा करण्याचे त्यांनी ठरविले. भारतातही त्याची योजना झाली.

त्याकाळी भारतात प्लेग नावाचा भयंकर रोग धिंगाणा घालीत होता. घरोघरी लोक मरत होते. गावे ओस पडत

होती. प्लेगच्या मदतीला दुष्काळ आला होता. लोकांची अन्नान्नदशा झाली होती आणि सरकारी अधिकारी उत्सव साजरा करण्यासाठी, लोकांजवळून पैसे वसूल करीत होते; दिवाळीसारखे दिवे जाळत होते; मेजवान्या झोडत होते; जनतेच्या अनंत जखमांवर जाणूनबुजून मीठ चोळीत होते.

तेजस्वी तरुणांना हे सहन झाले नाही. त्यांच्या अंतःकरणात क्रोधाचे निखारे फुलू लागले आणि चाफेकर बंधूंच्या रूपाने एकदम भडका उडाला. "याचा सूड घेतलाच पाहिजे आणि आम्ही तो घेणार!" असे चाफेकर बंधूंनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक २२ जून १८९७ रोजी मध्यरात्री मेजवान्या झोडून येणाऱ्या रँड व आयर्स्ट नावाच्या दोघा इंग्रज अधिकाऱ्यांचा वध केला.

स्वतंत्रतेच्या रणात मरुनी चिरंजीव झाले



बाळकृष्ण हरि चाफेकर



वासुदेव हरि चाफेकर



दामोदर हरि चाफेकर

लवकरच चाफेकर बंधू पकडले गेले. त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. त्यांनी वीरासारखे आनंदाने मृत्यूचे स्वागत केले.

या सगळ्या गोष्टी विनायकाच्या भावनाशील अंतःकरणात खळबळ उडवीत होत्या. आग पेटवीत होत्या. वारंवार त्याच्या मनात विचार येत होता, "होय, असे सगळ्या देशभर झाले पाहिजे. आमच्या देशाच्या या दुष्ट शत्रूंना जागोजागी ठेचले पाहिज ! पण हे कोण करणार ? आपला सगळा समाज दुबळा आहे, भित्रा आहे, आळशी आणि मूर्ख आहे. या समाजात अधिक चाफेकर कुठून येतील ? आणि मग उत्तर येई, "मी ! मी ते काम करीन ! चाफेकरांनी पेटविलेली मशाल मी विझू देणार नाही." शाळेत शिकणाऱ्या त्या बाल विनायकाने चाफेकरांच्या बलिदानावर एक सुंदर फटका लिहिला. इंग्रज सरकारला जणू त्यांनी बजावले, "दुष्टांनो करा, किती छळ करतां तो ! जितका तुम्ही छळ कराल तितकी त्या देशभक्त हुतात्म्यांची कीर्ति वाढेल. माफीचा साक्षीदार तो द्रविड म्हणजे काळाकुट्ट अंधार ! त्या पार्श्वभूमीवर चाफेकराचे यश म्हणजे कसे एखाद्या तेजस्वी रत्नासारखे झळकते आहे !"

: ७ :

इसवी सन १८९९ साली नाशिकला प्लेगने अगदी कहर केला. शाळा बंद झाल्या. दामोदरपंतानी मुलांना घरी आणले.

पण थोड्याच दिवसात भगूरलाही प्लेग सुरू झाला. हा आजारी झाला, तो झाला अशा बातम्या येऊ लागल्या.

दामोदरपंत मुलांना कोठे जाऊ देत नसत. पण स्वतः मात्र कोणी आजारी झाल्याचे ऐकल्याबरोबर त्याच्या मदतीला धावत असत. एके दिवशी ते इतक्या उशिरा घरी गेले की सकाळी बाहेर पडले होते ते संध्याकाळी घरी आले. आणि आले ते पायात प्लेगची गाठ घेऊनच आले. लंगडत लंगडत घरात आले आणि अंथरुणावर पडले. तापाने शरीर फणफणले होते. गाठ मोठी होत होती. मुले गांगरली, घाबरली, कळवळली, रडली पण कठोर काळाला दया आली नाही.

दिनांक ५ सप्टेंबर १८९९ च्या मध्यरात्री काळाने दामोदरपंताना ह्या लोकातून नेले. मुले पोरकी झाली. आई आधीच गेली होती. आता वडीलही गेले. मुलांवर आलेल्या या संकटामुळे दामोदरपंताचे भाऊ मुलांच्या मदतीला धावले. त्यांना सर्वजण बापूकाका म्हणत. बापूकाकांचे व दामोदरपंताचे भांडण होते. ते एकमेकाशी बोलत नसत. मुलांवर ओढवलेला प्रसंग पाहून बापूकाकांचे हृदय द्रवले. ते वैर विसरले पण काळाला तेही पाहवले नाही. तो लवकरच त्यांनाही उचलून घेऊन गेला. एवढ्याने संपले नाही. संकटे एकटी येत नाहीत एकदा येऊ लागली की त्यांची रांग लागते. सगळयांचा लाडका चिमुकला नारायण तोही प्लेगने आजारी पडला. त्याला प्लेगच्या रुग्णालयात ठेवण्यात आले. त्याच्या सेवेसाठी बाबा तेथे दिवसभर रहात.

दिवसभर विनायक अगदी बेचैन असे. बाबावर तर हा रोग आक्रमण करणार नाहीना ? या चिंतेने तो अगदी रडकुंडीला येई. संध्याकाळी बाबा घरी आले की त्याला हायसे वाटे. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच भीतीची तलवार त्याच्या डोक्यावर टांगलेली असे. शेवटी भीती खरी ठरली. बाबानाही प्लेग झाला; त्यानाही रुग्णालयात रहावे लागले. तथापि ईश्वराने शेवटी कृपा केली. बाबा आणि नारायण दोघेही रोगमुक्त झाले आणि सुखरूप घरी आले.

: ८ :

प्लेग ओसरला. बाबा सगळा परिवार घेऊन नाशिकला आले. विनायकाची शाळा सुरू झाली. त्याचे शाळेबाहेरचे अनेक उद्योग सुरू झाले. विनायक आता निवडक मित्र जोडू लागला. बाबाच्या आजारीपणात त्र्यंबकराव म्हसकर व रावजी कृष्ण पागे यांच्याशी विनायकाचे विशेष सख्य जमले. पागे आणि म्हसकर दोघेही जहाल विचाराचे होते.

सावरकर कुटुंब नाशिकला तिलभांडेश्वराच्या गल्लीत रहात होते. त्याच गल्लीत काही दिवसांनी आबा दरेकर रहायला आला. आबाचे नाव होते गोविंद. त्याचे वडील वारले होते. त्याची आई आनंदीबाई मोलमजुरी करून मुलांचा सांभाळ करीत होती. मुलगा हुशार होता पण एका जिऊ्याच्या आजारात तो लुळापांगळा झाला. पायांचे बळ जत नव्हते,

जिभेत आले. तो कविता करू लागला. डफ–तुणतुणे वाजवू लागला. लावण्या आणि पदे लिहू लागला. त्याच्याभोवती सदा मित्रमंडळींचे कडे असे. तिलभांडेश्वर गल्लीत रहायला आल्यावर त्याने विनायकाची कीर्ती ऐकली. चाफेकरांवर त्याने रचलेला फटका ऐकला. तो विनायकाला भेटायला आला. भेटायला आला आणि विनायकाचा शिष्य बनला; दास बनला, अनुयायी बनला.

फुलांच्या सहवासाने माती सुगंधी होते तसे झाले. विनायकाशी मैत्री जडल्याबरोबर आबाच्या अंतःकरणात देशप्रेमाची गंगा वाहू लागली. तो पूर्वी शृंगारिक लावण्या लिहीत होता. आता वीररसाने भरलेले पोवाडे लिहू लागला. उनाडक्या करणारा आबा संपला. मुले गोळा करून त्यांच्या मनावर देशभक्तीचे संस्कार घडविणारा स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद आता उदयाला आला.

पागे, म्हसकर, दरेकर आदी मंडळींच्या सहाय्याने विनायकाने १ जानेवारी १९०० रोजी "मित्र मेळा" ही संस्था सुरू केली. गणेश उत्सव आणि शिवजयंती हे दोन उत्सव मित्रमेळा विशेष थाटाने साजरे करी. वर्षभर लहानमोठी व्याख्याने, वक्तृत्वस्पर्धा, वादविवाद इत्यादी कार्यक्रम होत असत. सगळ्या शहरांत मित्रमेळ्याचे उत्सव चमकून दिसत.

प्लेगच्ये'पेळयाच्या बैठकी आबा दरेकरच्या घरी भरत. तिथे तेथे दिवसभाखले जात. गीते, प्रहसने रचली जात. नवेनवे

तरुण त्या निमित्ताने एकत्र येत असत. त्यांच्या आपसात ओळखी होत असत. त्यांना नीट पारखले जाई नि मग त्यांच्यापैकी जे योग्य असतील त्यांना स्वातंत्र्यदेवतेच्या पूजेसाठी नेण्यात येई.

"मित्रमेळा" म्हणजे जणू स्वतंत्रता देवीच्या मंदिराचे सभागृह होते. खास भक्तानांच गाभाऱ्यात घेतले जात असे. हा गाभारा म्हणजे "राष्ट्रभक्त समूह" नावाची गुप्त मंडळी. "मित्रमेळा" जनजागृतीचे प्रकट काम करीत असे. 'राष्ट्रभक्त-समूह' इंग्रजांशी लढा देण्याच्या गुप्त योजना आखीत असे.

: ९ :

वडील गेले आणि काकाही गेले. भगूरच्या घराला कुलुप लावून ही मुले नाशिकला येऊन राहिली. व्यवहाराकडे त्यांचे लक्षही नव्हते. बाबा मधून मधून गावी जाणे-येणे करीत. थोडा पैसा, काही धान्य घेऊन येत. काही दिवस बरे चालले. पुढे परिस्थिती बिघडत गेली. एक दिवस बातमी आली की भगूरच्या घरात चोरी झाली. बाबा आणि तात्या जाऊन पहातात तो घर अगदी रिकामे. लहानमोठी भांडी देखील चोरांनी लांबविली होती. सगळ्या पेट्या त्यांनी उघडल्या होत्या. कपाटांची कुलपे तोडली होती. महत्त्वाचे कागदपत्र नाहीसे झाले होते.

दामोदरपंताना देणेही होते आणि घेणेही होते. ज्याच्या जवळून काही घ्यायचे होते ते आधीच तोंड दाखवीत नव्हते,

आता तर काय कागदपत्रच उरले नाहीत ! सावकार मात्र भगूरला, नाशिकला वारंवार खेपा घालू लागले. ही लहान मुले आहेत. त्यांच्यावर काही दया करावी, त्यांना काही सवलत द्यावी, काही उपाय सुचवावा असा विचार त्यांच्यापैकी कोणालाही कधी शिवला नाही. विनायकाला न कळत येसूवहिनीचे सगळे दागिने बाबानी सावकाराला नेऊन दिले. कसेबसे कर्ज फिटले. पण आता रोजच्या जेवणाची भ्रांत पडू लागली. बाबानी लहानमोठ्या नोकऱ्या धरल्या.

संक्रांतीचा सण आला. येसूवहिनी हळदीकुंकवाला जायला निघाल्या. ह्यापूर्वी विनायकाने पाहिलेले दोन मोठे ठसठशीत अलंकार आज त्यांच्या गळ्यात नव्हते. विनायकाच्या ते लक्षात आले. वहिनी घरी आल्यावर विनायकाने त्याबद्दल विचारले. आणि मग वहिनीने सगळी हकीकत सांगितली. एकूणएक मोठे दागिने कर्जापायी गेले होते. काही दागिने बाबानी भोळेपणाने घालविले होते. घर चालविण्यासाठी काही विकावे लागले होते. शिवाय बाबानी मध्यंतरी अनेक लहानमोठ्या नोकऱ्या धरल्या होत्या. अगदी दुष्काळी कामावरसुद्धा बाबा गेले होते.

तो सगळा वृत्तांत ऐकून विनायक अतोनात रागावला. बाबा घरी आल्याबरोबर तो त्यांना म्हणाला, "बाबा, मी आजपासून शाळा सोडली. यापुढे मीही तुमच्यासारखीच नोकरी करीन किंवा पडेल ते लहानमोठे काम करीन. तुम्ही जिवापाड मेहनत करावी आणि मी आयते बसून खावे हे यापुढे होणे शक्य नाही."

विनायकाचे ते बोलणे ऐकून बाबांच्या डोळयात अश्रू उभे राहिले. ते गहिवरून म्हणाले, "नाही. तात्या, असे बोलू नकोस. आपले आण्णा गेल्यावर तुला मोठे करायची जबाबदारी माझी आहे. आपले आण्णा तुला खूप शिकविणार होते; ती त्यांची इच्छा कसेही करून मला पूर्ण केली पाहिजे. तात्या तूं कोणी तरी दैवत आहेत, पूर्वजन्मीचा कोणी थोर तपस्वी आहेस. आमच्या घरात तू जन्माला आला आहेस हे आमचे भाग्य आहे. तू पुढे कोणीतरी फार फार थोर पुरुष होणार आहेस. तुला सांभाळावे, शिकवावे, वाढवावे, हेच आमचे काम आहे. आम्ही वाटेल ती खटपट करू पण तुला त्रास होऊ देणार नाही. तू उदंड अभ्यास कर. वाच, लिही, दिगंत कीर्ति मिळव. तुझ्यामुळेच आपल्या कुळाचे नाव अमर होणार आहे."

विनायकाला काय बोलावे ते समजेना आपल्या वडील-भावाचे उदार अंतःकरण पाहून त्याच्या डोळयातून घळघळा अश्रु वाहू लागले. त्याने बाबाच्या पायावर डोके ठेवले.

: १० :

विनायकामुळे तिलभांडेश्वराच्या त्या लहानशा गल्लीत नवेच वारे संचरले. नाशिक शहरातील अनेक मुलांच्या जीवनाला नवे वळण मिळाले. जी मुले पूर्वी टिवल्याबावल्या करीत होती, आळसात वेळ घालवीत होती, ती आता वाचू लागली; लिहू लागली; अभ्यास करू लागली. स्वतःच्या आयुष्याचा, देशाचा, धर्माचा, विचार करू लागली. "मित्र-मेळा"

समाजाचा असा नियमच होता की त्याच्या सभासदांनी परीक्षेत उत्तम यश मिळविलेच पाहिजे. विनायक स्वतः त्याबद्दल काळजी घेत असे. वाचणे, कविता करणे, मित्र-मेळयाच्या बैठकी, राष्ट्रभक्त समूहाच्या बैठकी, समाजसेवेची अनेक कामे एवढे सगळे करूनही विनायक वर्गातला अभ्यास वेळच्या वेळी करीत असे. परीक्षेच्या आधी तो रात्ररात्र जागून अभ्यास करीत असे. त्याचा क्रमांक नेहमी पहिल्या दहांत असायचा.

विनायक मॅट्रिकच्या वर्गात आला. जोमाने अभ्यास करू लागला. पण हाय रे दैवा! तीनच महिन्यांनी तो खूप आजारी झाला. विनायकाला फणफणून ताप चढला. दोन दिवस झाले, चार दिवस झाले, तरी ताप उतरेना. बाबाच्या तोंडचे पाणी पळाले. प्रसिद्ध वैद्याचे औषध सुरू केले. पण उतार पडेना. एक दिवस तर विनायकाने अगदी डोळे पांढरे केले होते. सर्वांनी आशा सोडली. बाबा खाली मान घालून उशाशी बसले होते. तोच विनायकाच्या तोंडून शब्द बाहेर पडले—" बाबा, माझ्या पुढील शिक्षणाचे कसे होणार?" ते तापातले बरळणे होते. पण विनायक अगदीच बेशुद्ध होता त्यापेक्षा आता बरा आहे हे पाहून बाबाना आनंद झाला. त्यानी विनायकाच्या मस्तकावरून प्रेमाने हात फिरविला आणि ते म्हणाले, " तात्या, त्याची काहीएक काळजी करू नकोस. मी वाटेल ते कष्ट सहन करीन; वेळी भीकसुद्धा मागेन

पण तुझ्या सर्वोच्च शिक्षणाची मी व्यवस्था करीन. तू लवकर बरा हो!"

विनायक हळूहळू बरा झाला. तो पुन्हा शाळेत जाऊ लागला. बाबांनी त्याच्या मामाच्या विचाराने विनायकाचे लग्न ठरविले. लग्नात अट एकच होती ती ही की विनायकाच्या पुढील शिक्षणाची सगळी जबाबदारी सासऱ्याने उचलली पाहिजे. जव्हार येथील श्री. भाऊसाहेब चिपळूणकर या गोष्टीला तयार झाले आणि लग्न ठरले.

इसवी सन १९०१ च्या मार्च महिन्यात नाशिक येथे हे लग्न झाले. सहा महिन्यांनी मॅट्रिकची परीक्षा झाली. विनायक ती उत्तीर्ण झाला आणि दिनांक २४ जानेवारी १९०२ रोजी त्याने पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये पहिल्या वर्षात प्रवेश घेतला.

: ११ :

"आपण परदेशी कापड जाळून टाकले पाहिजे. परदेशी कापड हे नुसते कापड नाही ते इंग्रजांचे प्रतीक आहे. त्यांच्या विजयाचे चिन्ह आहे. आपल्या गुलामगिरीचे चिन्ह आहे. चौकाचौकातून विदेशी कापडाच्या होळ्या पेटल्या पाहिजेत. त्या होळ्यांतून निघणाऱ्या ज्वालांचा घराघरात प्रकाश पडेल. त्या होळ्या पाहून इंग्रजांच्या हृदयात धडकी भरेल!"

विनायकराव सावरकर, फर्ग्यूसन कॉलेजमधील आपल्या निवडक मित्रमंडळींना समजावून सांगत होते. नाशिकचे सगळे

सावरकरांचे स्फूर्तिस्थान



शिवरामपंत परांजपे



टिळक

उद्योग त्यांनी पुण्यालाही सुरू केले होते. इथेही त्यानी मित्रमेळा सुरू केला आणि 'अभिनव भारत' नावाची गुप्त संस्था स्थापन केली. बंगालच्या फाळणीमुळे आणि लॉर्ड कर्झनच्या दडपशाही-मुळे देशातील वातावरण तापले होते. त्याचा लाभ घेऊन एक पाऊल पुढे टाकायचे असे त्यानी ठरविले. ते म्हणाले, "नुसत्या सभा आणि तीच ती व्याख्याने आता पुरे झाली. आता कृती हवी आहे. दिपवून टाकणारी कृती हवी आहे. शंभर व्याख्यानांनी जे काम होत नाही ते काम तेजस्वी अशा एकाच कृतीने होईल."

विनायकरावांचे म्हणणे सगळ्यांना पटले. पण ती तरुणांची टोळी लोकमान्य टिळकाना जाऊन भेटली. विनायकरावांनी आपली योजना टिळकांपुढे मांडली. टिळक म्हणाले, "योजना

चांगली आहे. पण होळी करायची तर ती नुसती दहा–पाच कपड्यांची नको. खूप मोठा ढीग जमवा तर त्याचा परिणाम होईल. तसे न केले तर लोकांना तो नुसता पोरखेळ वाटेल, आणि त्या कल्पनेचे हसे होईल. असे होऊ देऊ नका."

टिळकांचा आशीर्वाद मिळाल्याबरोबर त्या सगळ्या तरुणांत नवा आवेश संचारला. तहानभूक विसरून ते सगळ्या शहरभर विदेशी कपडे गोळा करीत हिंडले. संध्याकाळपर्यंत त्यांनी भला मोठा ढीग उभा केला. भर चौरस्त्यावर तो पेटविण्यात आला आणि तेथे टिळक, शिवरामपंत परांजपे



आदी वक्त्यांची उत्कृष्ट भाषणे झाली. नवतरुण विनायकानेही आपल्या वक्तृत्वाने लोकांना थक्क केले.

त्याच वेळी नाशिकलाही तशीच होळी झाली. पुणे शहरात इतर ठिकाणीही लहान लहान होळ्या झाल्या. पुणे शहरातील वातावरण तापले. इंग्रज सरकारने कान टवकारले पोलिसांनी विनायकरावांचे नाव काळ्या यादीत लिहून ठेवले. कॉलेजच्या अधिकाऱ्यांनी त्यांना दहा रुपये दंड ठोठावला आणि वसतीगृह सोडून जायला सांगितले.

कापडाच्या होळ्या विझल्या. पण हजारों लोकांच्या मनांत इंग्रजांविषयी असलेला द्वेष प्रगट झाला. शेकडो तरुणांच्या अंतःकरणात क्रांतीची ठिणगी चमकू लागली. इंग्रजांना येथून हाकलले पाहिजे, त्यासाठी आपण काहीतरी उद्योग केला पाहिजे—असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले.

: १२ :

ज्या मंडळात विनायक व त्याचे मित्र जेवत असत तेथे विनायकाने एक मोठे शिवाजी महाराजांचे चित्र आणून लावले. दर शुक्रवारी सर्वांनी एकत्र जमून त्या प्रतिमेसमोर आरती म्हणायचा नियम त्यांनी सुरू केला. ती शिवाजीची आरती विनायकरावांनीच रचली होती.

*आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला*
*आला आला सावध हो शिवभूपाला*
*सद्‌गादिता भूमाता दे तुज हाकेला*
*करुणारव भेदुनी तव हृदय न का गेला*
*जयदेव जयदेव जयजय शिवराया*
*या या अनन्य शरणा आर्या ताराया ॥ १ ॥*

अशी या आरतीची सुरवात आहे. ही आरती म्हणता म्हणता शिवाजी महाराजांचे सगळे चरित्र साररूपाने अंतःकरणात ठसत असे. बाहु स्फुरण पावत असत.

सिंहगडचा पोवाडा बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा विनायकरावांनी कॉलेजमध्ये असतानाच लिहिला होता. तरुणांना तो इतका आवडला की अगदी घरोघरी तो म्हटला जाऊ लागला.

*धन्य शिवाजी तो रणगाजी धन्याचि तानाजी*
*प्रेमे आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी*

जिजामातेने कोंडाणा जिंकला जावा अशी इच्छा कशी प्रगट केली, मुलाचे लग्न बाजूला सारून तानाजी मोहिमेवर जायला कसा तयार झाला, गड जिंकण्यासाठी काय युक्त्या योजिल्या याचे मोठे सुंदर वर्णन कवीने केले आहे. मध्यरात्री तानाजीने जेव्हा घोरपड किल्ल्याच्या तटावर सोडली तेव्हाचे वर्णन किती परिणामकारक आहे पहा :—

तानाजि चढूं लागले
सद्‌भाग्य चढूं लागलें
स्वातंत्र्य चढूं लागले
सांभाळी रे म्लेंछा आला, आला तानाजी
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी ॥

**बाजी प्रभूचा पोवाडा त्याहीपेक्षा बहारदार उतरला आहे. बाजीप्रभू आधी यवनांचे सेवक होते. शिवाजी महाराजानी त्यांच्या अंगचे गुण पाहिले. त्यानी आपले दूत बाजीप्रभूशी बोलणे करायला पाठविले आणि त्याचे मन वळविले. दूतांनी बाजीला सांगितले, अरे तुझ्यासारखे पराक्रमी लोक या भूमीचे पुत्र असूनही येथ यवनांचे राज्य का झाले; याचा जरा विचार कर ! बाजीराया आपल्या अंगचे गुण सत्कारणी लाव !**

बाजीराया म्लेंच्छ सबळ हा दोष न काळाचा ।
ना देवाचा ना धर्माचा किंवा नशिबाचा ॥
देशद्रोही चांडाळांचा भरला बाजार ।
गुलामगिरि जे देती त्यांना निष्ठा विकणार ॥
तुम्हीच ना स्वातंत्र्य चिरियलें या पोटासाठीं ।
तुम्हीच ना रे भूमातेच्या नख दिधले कंठीं ॥
हो सावध बाजीराया । दास्यि का काया । झिजविशी वाया ।
तुज भगवान श्री शिवराजा ।
स्वातंत्र्यप्राप्तीच्या काजा ।
बोलावी तिकडे जा जा ।

*देशभक्तीची सुधा पिउनि घे प्रायश्चित्ताला ।*
*चला घालु स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी घाला ।।*

आणि मग बाजीप्रभू शिवरायाचे एकनिष्ठ सेवक बनले. अफजुलखानाच्या वधाचा सूड घेण्यासाठी त्याचा मुलगा फाजलखान शिवाजीवर चालून आला. पन्हाळगडाला वेढा बसला. शिवाजीमहाराज आत अडकले. थोड्याच दिवसांनी त्यांनी तहाचे बोलणे केले आणि मध्यरात्री निसटले. पण शत्रूला सुगावा लागला. त्याने पाठलाग सुरू केला. बाजीने त्याला खिंडीत अडविले. तो प्रचंड हल्ला त्याने रोखून धरला. देहावर अनेक वार झाले पण बाजी लढतच होता. अजून खुणेची तोफ व्हायची होती. महाराज सुरक्षित पोहोचायचे होते. बाजीला मरायला फुरसत नव्हती.

*तोफेआधी मरे न बाजी सांगा मृत्यूला ।*
*चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।।*

थोड्याच वेळाने तोफेचे आवाज जेव्हा बाजीच्या कानी पडले तेव्हा त्याने सुखाने प्राण सोडले. विनायकरावांचे हे दोन्ही पोवाडे अप्रतिम आहेत. कितीही वेळा वाचले तरी ते पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटतात; पाठ करावेसे वाटतात.

"स्वतंत्रतेचे स्तोत्र" ही या काळातील सावरकरांची आणखी एक महत्त्वाची कविता आहे. ही कविता म्हणजे जणू सावरकरांच्या जीवनाचे सार आहे. मातृभूमीचे स्वातंत्र्य म्हणजे

सर्वस्व. तेच जीवनातले यश. तोच जीवनातला आनंद. तेच ध्येय आणि तोच मार्ग.

*जयो ऽ स्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे*
*स्वतंत्रते भगवति । त्वामहं यशोयुतां वंदे ॥*
*मोक्षमुक्ति हीं तुझींच रुंप तुलाच वेदांती*
*स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती*
*जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें*
*स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें*
*हे अधम रक्तरंजिते । सुजन पूजिते । श्रीस्वतंत्रते*
*तुजसाठि मरण तें जनन*
*तुजविण जनन तें मरण*
*तुज सकल चराचर शरण*
*भरत भूमिला दृढालिंगना कधि देशिल वरदे*
*स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥*

विनायकरावांचे कॉलेजमधील जीवन अशा प्रकारच्या उद्योगांनी अगदी तुडुंब भरलेले होते. या काळात त्यानी हजारों पुस्तकें वाचली आणि शेकडों लेख लिहिले. ' केसरी ' आणि ' काळ ' या वर्तमानपत्रांतही ते मधून मधून लिहीत असत. गावोगावी जाऊन व्याख्यानेही देत असत. कॉलेजच्या नाटकातही भाग घेत असत. सावरकरांचा उत्साह म्हणजे जणू गरुडाच्या उंच उंच भराऱ्याच होत्या !

एवढे सगळे करून ते आपला अभ्यासही चांगला ठेवीत. २१ डिसेंबर १९०५ रोजी ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. वकिलीचे पहिले वर्ष त्यांनी आधीच पदरात पाडून घेतले होते. दुसऱ्या वर्षासाठी ते मुंबईला राहिले. मुंबईच्या एक वर्षाच्या मुक्कामात "विहारी" साप्ताहिकात त्यांनी खूप लेखन केले. अनेक उघड कामे चालली असता गुप्त कामही जोमात चालले होते. "अभिनव भारत" या गुप्त क्रांतिकारी संस्थेचे सभासद वाढत होते. योग्य निवड करून वारंवार परीक्षा घेऊन कसोटीस उतरल्यावर मगच एखाद्या तरुणाला सदस्य होता येई. अशा रीतीते शहराशहरात सावरकर निखारे पेरीत होते.

त्याच वेळी वर्तमानपत्रात एक निवेदन प्रसिद्ध झाले. ते निवेदन इंग्लंडचे निवासी झालेल्या शामजी कृष्णवर्मा यानी दिलेले होतें. शामजी कृष्णवर्मा जहाल देशभक्त होते. ते लंडन येथे रहात. त्यानी 'इंडिया हाऊस' म्हणजे 'भारत भवन' या नावाचे एक केंद्रच लंडन येथे उघडले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या अनेक चळवळीचे ते मुख्य स्थान होते. ते केंद्र अधिक बलवान करण्यासाठी त्याना बुद्धिमान देशभक्त तरुण हवे होते. ते मिळविण्यासाठी त्यानी वर्तमानपत्रांत निवेदन देऊन शिष्यवृत्त्या घोषित केल्या होत्या. ती शिष्यवृत्ती विनायकराव सावरकराना मिळाली. सावरकरांच्या विनंतीपत्रा-बरोबर लोकमान्य टिळकांचे पत्र होते.

बॅरिस्टर होण्यासाठी विनायकराव इंग्लंडला जायला निघाले. ९ जून १९०६ रोजी ते 'पर्शिया' जहाजावर चढले. आपल्या प्रिय मातृभूमीचा त्यांनी निरोप घेतला. त्याना निरोप देण्यासाठी धक्क्यावर त्यांचे मित्र, नातेवाईक इत्यादी कितीतरी मंडळी जमली होती. विनायकराव सावरकरांची तेजस्वी मूर्ती जेव्हा जहाजावर चढली तेव्हा त्या सर्व मंडळींच्या मनात एकच विचार आला—हा सिंहाचा छावा आता वाघाच्या गुहेत चालला आहे.

: १३ :

सावरकरानी आपला पुढील उद्योग जहाजावरच सुरू केला. श्री. रमेशचंद्र दत्त व हरनामसिंग यांची त्यानी ओळख करून घेतली व त्यांना देशभक्तीची दीक्षा दिली. प्रवासातील अधिकतर वेळ त्यांनी शांतपणे विचार करण्यात घालविला. जहाजावरच्या खुल्या जागेत, तास चे तास ते एकटेच बसून रहात. "ज्योतिषी भलेभले चकले" ही सुंदर कविता त्यानी प्रवासातच लिहिली.

३ जुलई १९०६ रोजी सावरकर लंडनला पोहोचले. आसपासच्या सगळया माणसांशी ओळखी करून घेण्यात दोन–तीन महिने गेले. या काळात त्यांनी इटलीचा देशभक्त मॅझिनी याच्या चरित्राचा व लेखांचा मराठी जनतेला परिचय करून दिला. मॅझिनीवरील या ग्रंथाची प्रस्तावना सव्वीस पानांची आहे. ती प्रस्तावना तेजस्वी विचारांची जणू खाणच

ठाणे, नों. वि ... क्र.



*सिंहाच्या गुहेत*

आहे. ते पुस्तक पाहून इंग्रज सरकारला भीती वाटली. हे पुस्तक जर तरुण वाचतील तर आपल्याविरुद्ध सगळीकडे आग भडकेल असे सरकारला वाटले. सरकारने ते पुस्तक जप्त केले. जो कोणी ते पुस्तक विकील, वाचील, जवळ बाळगील त्याला कडक शिक्षा होईल असे सरकारने जाहीर केले. पुस्तक सरकारने जप्त केल. पण डोके तर जप्त केले

नव्हते ! महाराष्ट्रातील शेकडो तरुणांनी ती सव्वीस पानांची प्रस्तावना पाठ केली.

कांही दिवसांनी "फ्री इंडिया सोसायटी" स्थापन करण्यात आली. तिचे लहानमोठे कार्यक्रम होऊ लागले. वादविवाद व्याख्याने आदी उघड कार्यक्रम ही संस्था करीत असे. तेथे जमणाऱ्या लोकांतून सावरकर निवड करीत. त्यांना "अभिनव भारत" या गुप्त संस्थेचे सभासद बनवीत. सावरकरांचे काम वेगाने चालू झाले. पण लिहिण्यावाचण्यात खंड नव्हता. "काळ" व "विहारी" या पत्राकरिता सावरकर बातमीपत्रे पाठवीत असत. जगात घडणाऱ्या निरनिराळ्या गोष्टींकडे आपण कसे पाहिले पाहिजे याचा धडा त्या बातमीपत्रांनी शिकविला जात असे.

१० मे १९०७ रोजी १८५७ च्या क्रांतियुद्धाला पन्नास वर्षे होणार होती. सावरकरांनी त्या इतिहासाचा अभ्यास सुरू केला. दिवसाचे दहा तास ते ब्रिटिश ग्रंथ संग्रहालयात जाऊन बसत आणि जुन्या कागदपत्रांचा अभ्यास करीत. १८५७ च्या त्या पहिल्या भारतीय क्रांतियुद्धावर त्यांनी मराठीत एक मोठा ग्रंथ लिहिला. तो त्यांनी हिंदुस्थानात पाठविला. पण येथे तो कोणीही छापायला तयार होईना, मग त्याचे इंग्रजीत भाषांतर केले. पण ते देखील इंग्लंडमध्ये छापले जाणे अशक्यच होते. बऱ्याच प्रयत्नानंतर ते हॉलंडमध्ये छापले गेले. अनेक युक्त्या योजून पुस्तकाच्या प्रती

बंगाल, पंजाब, आंध्र आदी प्रांतात पोहोचल्या. क्रांतिकारक लोकांना ते पुस्तक भगवद्गीतेसारखे पवित्र वाटत होते.

भारतीयांनी मनापासून आपले गुलाम व्हावे अशी इंग्रजांची इच्छा होती. त्यासाठी भारताचा इतिहास बदलून टाकण्याचे इंग्रजांनी ठरविले. शाळांतून आणि महाविद्यालयांतून इतिहासाच्या नावाखाली खोट्या गोष्टी शिकविल्या जाऊ लागल्या. १८५७ च्या प्रयत्नाला इंग्रजांनी "शिपायांचे बंड" असे नाव दिले होते. "तो एक मूर्खपणा होता. त्यातील सगळे पुढारी स्वार्थी-लुटारू होते. इंग्रजांनी ते बंड सहज मोडून काढले-असे विचार इंग्रज लेखक लिहीत असत. सावरकरांनी ते सगळे मुद्दे खोडून काढले. ते बंड नव्हते. ते स्वातंत्र्ययुद्ध होते. त्यातील पुढारी श्रेष्ठ होते. त्यातील अनेक उत्तम सेनापती होते. त्यांचा पराक्रम पाहून इंग्रज सेनापती देखील चकित झाले होते. त्यावेळी काय काय चुका आपण केल्या त्या आपण कशा सुधारल्या पाहिजेत; तीच आग आज कशी भडकविली पाहिजे---असे सगळे विचार सावरकरांनी आपल्या ग्रंथात मांडले होते. भरपूर ऐतिहासिक पुरावे त्यांनी दिले होते, ग्रंथ जसा जहाल होता तसाच विद्वत्तापूर्ण होता. पण विद्वत्तेची कदर करणे इंग्रजांना परवडणारे नव्हते. त्यांनी तो ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीच जप्त केला. पण अनेक युक्त्या योजून कशा न कशा तरी रीतीने तो प्रकाशित झालाच.

: १४ :

१० मे १९०७ रोजी इंडिया हाऊसमध्ये १८५७ च्या क्रांतियुद्धाचा पन्नासावा वाढदिवस मोठ्या थाटामाटाने साजरा करण्यात आला. त्या समारंभाची आखणी सावरकरांनी केली होती. सभागृह उत्तम सजविण्यात आले होते. सत्तावनच्या वीर पुढाऱ्यांची चित्रे सुशोभित करून लावण्यात आली होती. उदबत्त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. राष्ट्रगीताचे गायन झाले. सगळी सभा जणू भारली गेली. सभागृह लोकांनी फुलले होते. शेकडो लोकांना बाहेर उभे रहावे लागले होते. पण कुठे काही गोंगाट नव्हता कीं गडबड नव्हती. सावरकरांचे भाषण झाले. नानासाहेब पेशवे व बहादुरशहा यांचे थोरपण सावरकरांनी पटवून दिले. इंग्रज लेखकांनी लिहिलेल्या खोट्या गोष्टी त्यांनी खोडून काढल्या आणि सांगितले की ह्या वीरांनी जी ज्योती पेटविली ती आपल्याला मोठी करायची आहे. त्यासाठी सर्व प्रकारचे बलिदान करावे लागले तरी आपण ते आनंदाने केले पाहिजे !'

सावरकरांच्या तेजस्वी व्याख्यानाने सगळ्यांची मने उंचावली. अंगावर रोमांच उभे राहिले. लगेच प्रतिज्ञांची लाट उसळली. कोणी मद्यपान सोडले, कोणी धुम्रपान सोडले, कोणी नाटक सिनेमा न पहाण्याचा निश्चय केला. आपल्या देशासाठी शरीराने, मनाने आणि धनाने झिजणाऱ्या अनेकांनी अनेक परींनी प्रतिज्ञा घेतल्या. सत्तावनच्या वीरांची स्मृति

म्हणून एक चिन्ह तयार करण्यांत आले होते. ते सर्वांनी आपल्या छातीवर लावले. मग राष्ट्रगीताचे गायन झाले आणि प्रसाद वाटण्यात आला.

प्रसाद काय होता? प्रसाद होता, चपात्या. १८५७ मध्ये क्रांतीची पूर्वतयारी चालु असता एका गावाहून दुसऱ्या गावाला चपात्या पाठविण्यात येत होत्या. ती त्याकाळची एक प्रकारची शपथ होती—"आम्ही अन्नाला स्मरून सांगतो की आम्ही इंग्रजाविरुद्ध लढू. क्रांति-कारकांच्या विरुद्ध वागणार नाही! ती शपथ जागी करण्यासाठी यावेळी चपात्यांचा प्रसाद वाटण्यात आला आणि सरते शेवटी "अहो हुतात्म्यानो!" हे शीर्षक असलेले छापील पत्रक वाटण्यात आले.

हे पत्रक सावरकरांनीच लिहिले होते. त्यात त्यानी म्हटले होते—"आज दिनांक १० मे! हुतात्म्यांनो! आजचा दिवस नेहमी लक्षात ठेवावा असा आहे. कारण याच दिवशी आपल्या प्रिय भारतभूमीला दास्यातून सोडविण्यासाठी तुम्ही आपल्या तरवारी उपसल्या. लक्ष लक्ष लोकांच्या कंठातून "मारो फिरंगी को" ही रण घोषणा याच दिवशी निघाली. सतत फडकत रहावा असा ध्वज तुम्ही या दिवशी उभारलात. तुम्ही केलेल्या घोषणेचा आम्ही स्वीकार करतो; तुम्ही उभारलेल्या ध्वजाचा आम्ही सन्मान करतो; तुमचेच कार्य पुढे चालविण्याचा आमचा निर्धार आहे. १८५७ साली

तुम्ही चालू केलेला संग्राम पुढेही लढत रहाण्याचा आम्ही निश्चय करतो.

थोर हुतात्म्यांनो ! या पवित्र झगड्यात तुम्ही तुमच्या या पुत्रांना सहाय्य करा. आज जिकडे तिकडे स्वार्थ बोकाळला आहे. फूट माजली आहे. त्यावर चांगलासा उपाय आम्हाला शिकवा. तुमचा अलौकिक उत्साह, साहस, गुप्तपणा आम्हाला द्या. हुतात्म्यांनो ! तुमच्या प्रयोगात तुम्हाला ज्या चुका आढळल्या असतील त्याही आम्हाला सांगा म्हणजे तशा चुका आम्ही होऊ देणार नाही. आणखी पंचवीस वर्षांतच तुमच्या इच्छा पूर्ण होतील. सगळा भारतवर्ष एका निर्धाराने उठेल. कारण थडग्यात पडून असलेली बहादुरशहाची हाडे 'सूड सूड !' म्हणूंन ओरडत आहेत; निर्भय लक्ष्मीबाईचे रक्त रागाने उकळत आहे. पाटण्याचा शहीद परिअल्ली याने कटातील गुप्त गोष्टी सांगितल्या नाहीत म्हणून त्याला फाशी देण्यात आले. फासावर चढता चढता तो म्हणाला होता : माझी जागा भरून काढायला हजारो तरुण पुढे येतील. भारतीयांनो, हे शब्द खरे झाले पाहिजेत. हुतात्म्यांनो, तुमच्या खुनाचा बदला आम्ही घेऊच घेऊ ! वंदे मातरम् !

: १५ :

त्या काळी हिंदुस्थानातील शेकडो तरुण इंग्लंडमध्ये जात असत. श्रीमंत तरुण चैन करण्यासाठी जात. बुद्धिमान तरुण शिक्षण घेण्यासाठी जात. तेथे गेल्यावर बहुतेक सर्वजण तेथील



...कमल फूल ते अमर जाहले।

वैभवाने दिपून जात. इंग्रजांच्या सगळ्या गोष्टी चांगल्या. आपल्या सगळ्या गोष्टी वाईट, अशी त्यांची भावना बने. इंग्रज दारू पितो, आपणही दारू प्यावी. इंग्रज नाचतो, आपणही

नाचायला शिकावे; आपली रीतभात सोडून द्यावी आणि इंग्रजांची स्वीकारावी असे त्या तरुणांना वाटे. इंग्लडमध्ये राहून शरीर, मन आणि बुद्धीने ते इंग्रजांचे दास बनत. असा तो काळ होता.

पण सावरकरांनी त्या गोष्टी पार बदलून टाकल्या. त्यानी जणू काळाला जोराची कलाटणी दिली. खुद्द लंडन शहरात त्यांनी क्रांतीचे मोठे केंद्र उघडले. चांगले चांगले तरुण त्यांच्याभोवती जमा होऊ लागले. होतीलाल वर्मा, हेमचंद्र दास, सेनापती बापट, व्यंकट सुब्रह्मण्य अय्यर, सुखसागर दत्त, निरंजन पाल, मिस्टर खान, गोविंद मेनन, डॉ. राजन, मदनलाल धिंग्रा हे त्यांपैकी प्रमुख होत. कोणी डॉक्टर होण्यासाठी आले होते तर कोणी बॅरिस्टर होण्यासाठी. कोणाला आय. सी. एस. व्हायचे होते. सावरकरानी त्यांच्या कानात क्रांतीचा मंत्र फुंकला. त्यांच्या अंतःकरणात त्यागाची ज्योत पेटविली.

त्यांचा उत्साह दुपटी चौपटीने वाढला. त्यांच्या अंगात वीरश्री संचारली. आपल्या ठराविक अभ्यासाव्यतिरिक्त ते इतर कितीतरी गोष्टी शिकू लागले. ते नेमबाजीचे शिक्षण घेऊ लागले. पिस्तुल बंदूक चालवायला शिकू लागले. बॉम्बगोळे तयार करण्याची क्रिया शिकू लागले. त्याकरिता अनेकांना परदेशी धाडण्यात आले. कोणी फ्रान्समध्ये गेला तर कोणी जर्मनीत गेला. कोणी रशियन क्रांतिकारकांशी संबंध जोडले.

लोक कसे जोडायचे, कट कसे रचायचे, बाँब कसे फेकायचे, गुप्ततेने कसे वावरायचे, सगळी तंत्रे हे लोक शिकू लागले.

लंडन येथे गुप्त ठिकाणी खूपशी पिस्तुले जमविण्यात आली. कशाकरिता ? हिंदुस्थानात पाठविण्याकरिता ! पण ही कशी पाठविता येतील ? इंग्रज अधिकारी कशी नेऊ देतील ? आणि हिंदुस्थानात तर शस्त्रांचा कडक कायदा होता. लहानशी सुरी ठेवायची तरी सरकारी परवानगी पाहिजे. तेथे ही पिस्तुले कशी जाणार ? पण इच्छा तीव्र असली की मार्ग सापडतो. पुस्तके कोरायची, त्यांत पिस्तुले बसवायची आणि हिंदुस्थानात पाठवायची. अशा अनेक युक्त्या करण्यात आल्या. हजारों पिस्तुले हिंदुस्थानात पोहोचली. बाँबगोळे तयार करण्याची रीत सांगणारी पुस्तके पोहोचली. प्रत्यक्ष प्रयोग करून शिकविणारे तरुण पोहोचले. हिंदुस्थानच्या प्रांताप्रांतांतून क्रांतीची गंगा वाहू लागली.

## : १६ :

शामजी कृष्णवर्मा, विनायकराव सावरकर वगैरे मंडळी तरुणांमध्ये देशभक्ती निर्माण करीत होती. तिकडे इंग्रजही काही गुपचुच बसले नव्हते. त्यांचेही निरनिराळ्या प्रकारचे उपाय सुरू होते. हिन्दुस्थानात त्यांनी कडक धोरण सुरू केले. जुलुम दडपशाही सुरू केली.लोकमान्य टिळकाना काळ्या पाण्यावर पाठविले, लाला लाजपतरायाना हद्दपार केले, शेकडों वर्तमानपत्रांना दंड ठोठावला. संपादकांना कैद केले,

देशभक्तीचे विचार सांगणारी पुस्तके जप्त केली. साम, दाम, दंड, भेद हे राजनीतीचे सगळे प्रकार ते खेळत होते.

हिन्दुस्थानातून येणाऱ्या तरुणांना आपल्या जाळयात ओढण्यासाठी त्यांनी नॅशनल इंडियन असोसिएशन या नावाची एक संस्था सुरु केली. ली वार्नर आणि कर्झन वायली हे तिचे प्रमुख अधिकारी होते. हिंदुस्थानातून कोणीही विद्यार्थी आले की हे त्यांना भेटत असत. त्यांच्याशी गोड बोलून, त्यांना निरनिराळ्या प्रकारची मदत करून ते त्यांना

स्वा. सावरकर डॉ. मुखर्जी



आपलेसे करून ठेवीत. उद्देश हा की क्रांतिकारकांच्या गटात त्यांनी जाऊ नये.

विनायकरावांनी यावर तोडगा काढायचे ठरविले. मदनलाल धिंग्रा नावाच्या तरुणाला त्यानी तयार केले. मदनलाल पंजाबातला रहाणारा होता. त्याचे वडील पंजाबात मोठे पोलिस अधिकारी होते. मदनलाल लहानपणापासून अतिशय खोडकर होता. घरून तो भांडून निघाला होता. बोटीवर आगवाल्याच्या हाताखाली मजुराचे काम त्याने मिळविले आणि अशा युक्तीने तो इंग्लंडमध्ये पोहचला. त्याने इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये नाव दाखल केले. अतिशय बुद्धिमान, आनंदी, असा तो बावीस—तेवीस वर्षांचा तरुण होता. फ्री इंडिया सोसायटीच्या कार्यक्रमांना तो कधी कधी हजर रहात असे. एकदा सावरकरांची व त्याची अशाच एका कार्यक्रमात ओळख झाली आणि ती वाढत गेली. मदनलाल धिंग्रा अभिनव भारत या गुप्त संस्थेचा सभासद झाला.

भारत भवनातील मंडळी एकदा इंग्रजांच्या सहनशक्तीबद्दल बोलत होती. मदनलाल चटदिशी म्हणाला, "त्यात काय मोठेसे ? आपण हिंदू काय कमी आहोत ?" आणि मग बराच वेळ वादविवाद चालू राहिला. तो संपत नाही असे पाहून मदनलाल उठला आणि एक टाचणी घेऊन आला. म्हणाला, हे पहा, इतरजण हा हा म्हणतात तोच त्याने ती

आपल्या तळहातात एका बाजूने टोचली आणि दुसऱ्या बाजूने बाहेर काढली. रक्ताची धार वाहू लागली. पण त्याने हायसुद्धा म्हटले नाही. तो शांतपणे म्हणाला, "बस, मनाचा निर्धार पाहिजे. सहनशक्ती आपोआप येते" इतरांच्या तोंडून उद्गार निघाले, "अरे! आपण याला नुसता मौजी जीव समजत होतो पण हा तर आगीचा लोळ आहे!"

भारतभवनाच्या तिसऱ्या मजल्यावर एक लहानशी प्रयोगशाळा होती. बॉम्बसाठी लागणारे सामान तिथे ठेवण्यात येई; कधी कधी प्रयोगही केले जात. भाषणे देण्या-ऐकण्यापेक्षा मदनलालला प्रयोगशाळेतील कामे फार आवडत. एकदा चुलीवरचे काचेचे भांडे खूपच तापले. पण ते उतरायला जवळ चिमटा नव्हता. क्षणभर जर ते भांडे चुलीवर अधिक रहाते तर तेथे स्फोट झाला असता. पैशाचे नुकसान तर झालेच असते शिवाय शारीरिक इजाही झाली असती. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुप्त मंडळाची सगळीच गुप्तता नाहीशी झाली असती! आता काय करावे या पेचात विनायकराव क्षणभर पडले. तोच मदनलाल पुढे झाला. अतिशय तापलेले ते भांडे त्याने घट्ट धरले आणि शांतपणे खाली उतरवले. त्याच्या हाताची चामडी भाजली, जळली तरी तो हसत होता.

मदनला धिंग्रा असा होता. कर्झन वायलीचा काटा काढण्याचे काम या मदनलालवर सोपविण्यात आले. मदनलालने एक उत्तम पिस्तूल विकत घेतले आणि नेमबाजीचा अभ्यास सुरू केला.

१ जुलै १९०९ रोजी रात्री नॅशनल इंडियन असोसिएशनचा वाढदिवस थाटाने साजरा व्हायचा होता. जवळ जवळ दोनशे लोक जमले होते. भाषणे, खाणे, पिणे, गप्पा, सगळे झाले. रात्रीचे अकरा वाजले. लोक हळूहळू घरी जाऊ लागले. कर्झन वायलीही जायला उठले. तोच मदनलाल त्यांच्याजवळ गेला आणि बोलता बोलता पिस्तूल काढून त्याने वायलीच्या चेहऱ्यावर गोळी झाडली. लागोपाठ दुसरी तिसरी चौथी गोळीही झाडली गेली. कर्झन वायली तिथल्या तिथे मरून पडला. डॉ. लालकाका नावाचे एक पारशी गृहस्थ मध्ये पडले होते. तेही ठार झाले. पाचवी गोळी मदनलालने स्वतःवर झाडून घेण्याचा प्रयत्न केला पण तो साधला नाही. मदनलाल पकडला गेला. त्याच्यावर खटला चालला. त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. दि. १७ ऑगस्ट १९०९ रोजी सकाळी तो आनंदाने फाशी गेला.

मदनलाल मरून अमर झाला. मदनलाल आपल्या देशाकरिता मेला. न्यायालयासमोर त्याने दिलेले निवेदन कोणाला कळू नये असा इंग्रज सरकारने प्रयत्न केला पण त्याची एक प्रत सावरकरांजवळ आधीच होती. ती पॅरिसला पाठविण्यात आली होती. पॅरिसच्या वर्तमानपत्रात ती प्रसिद्ध झाली. युरोपभर एकच खळबळ उडाली. एवढ्या मोठ्या साम्राज्याचे केन्द्र जे लंडन तेथे एका भारतीयाने एका इंग्रजाचा वध केला म्हणजे काय ? युरोपातील लोक म्हणू लागले, झाले. आता इंग्रजांचे दिवस भरत आले."

मदनलाल धिंग्राचे ते कृत्य पाहून इंग्रज तर घाबरलेच; पण ज्यांच्या मनात गुलामी भिनली होती असे लंडनमधील भारतीय जास्तच भ्यायले. त्यांनी मदनलालचा निषेध करण्यासाठी सभा बोलाविली. सावरकर त्या सभेत गेले. सावरकरांनी ठरावाला विरोध केला. आरडाओरडा झाला. खुर्च्या, काठ्या, छत्र्या यांची मारामारी झाली. गोंधळात सभा संपली.

: १७ :

सावरकर बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले. पण त्यांना पदवी देण्याचे नाकारण्यात आले. लंडन पोलिसकडे त्यांचे नाव अनेक ठिकाणाहून येत होते. विनायक सावरकर अनेक भानगडींच्या मुळाशी आहेत असे सगळीकडून निरोप येत होते.

गेल्या वर्ष दीड वर्षात हिंदुस्थानात कितीतरी ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. कितीतरी ठिकाणी पिस्तुले झाडली गेली. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांवर आक्रमणे झाली. दि. ११ एप्रिल १९०८ रोजी चंद्रनगरच्या मेजरवर बॉम्ब फेकण्यात आला. दि. ३० एप्रिल १९०८ रोजी जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या अंगावर बॉम्ब टाकण्याचा प्रयत्न झाला. हे काम १८–१९ वर्षांच्या खुदीराम बोसने केले होते. या प्रकरणात नरेन्द्र गोस्वामी फुटला. त्याला ठार करण्यात आले आणि मग बंगालभर क्रांतीचा वणवा पसरला. २१ डिसेंबर १९०९ रोजी कान्हेरे नावाच्या

तरुणाने जॅक्सनचा वध केला. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, बिहार असे निरनिराळ्या प्रांतात कट होऊ लागले. पण त्या सगळ्यांच्या मूळाशी होते विनायकराव सावरकर. त्यानी कुणाला पिस्तुले पुरविली होती. तर कुणाला बॉंब तयार करण्याच्या कृतींची पुस्तके पुरविली होती. प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविणारे शिक्षक पाठविले होते.

लंडनचे पोलीस विनायकरावाभोवती जाळे पसरू लागले. इंग्रज जनताही ह्या क्रांतिकारक तरुणाविरुद्ध खवळली. इंडिया हाऊस बंद झाले. सावरकर निरंजन पॉल यांच्याकडे राहू लागले. पण रागावलेले शेकडो लोक पॉल यांच्या घराभोवती जमू लागले. शेवटी सावरकरांनी ते घर सोडले. पण आता त्याना कोठेही रहावयाला जागा मिळेना. जेथे ते जात तेथे लोक त्यांचा पाठलाग करीत. घरमालकाला ही व्यक्ती कोण आहे. हे कळले की तो सांगे, “ नाही, बुवा, आम्ही तुम्हाला आमच्या घरात ठेवू शकत नाही. ”

एकदा तर अगदी मध्यरात्री आपले चंबूगबाळे घेऊन त्याना एका हॉटेल बाहेर पडावे लागले होते. कधी झाडाखाली, कधी एखाद्या बगीचात, तर कधी रेल्वे स्टेशनवर असे ते दिवस काढू लागले. कधी जेवण नाही तर, कधी झोप नाही, तरी कामे चालूच आहेत. मनावर ताण पडतोच आहे. वाईट बातम्या ऐकायला मिळतच आहेत. आज हा पकडला गेला उद्या तो पकडला गेला. कोणी माफीचा साक्षीदार बनला, कट उघडकीस आला, अशा बातम्या रोज येत होत्या. एक दिवस तर कहर

झाला. त्यांच्या वडीलबंधूना गणेशपंताना जन्मठेपेची शिक्षा झाल्याची बातमी त्याना कळली.

विनायकरावांची प्रकृती बिघडली. त्यांच्या मित्रांनी त्यांना विश्रांतीसाठी लंडन बाहेर नेले. लंडनहून जवळच ब्रायटन नावाचे एक खेडे होते. तेथे दहा पंधरा दिवस सावरकरांना ठेवण्यात आले. 'सागरास' ही त्यांची प्रसिद्ध कविता ब्रायटन येथेच लिहिली गेली. एकदा ते आपल्या मित्रांबरोबर समुद्र किनाऱ्यावर बसले असता त्यांच्या अंतःकरणात भावना उचंबळून आल्या. आपल्या मायभूमीची, घराची, नातेवाईकांची त्याना तीव्रतेने आठवण झाली. आता त्या सगळ्यांची व आपली पुन्हा गाठ पडते की नाही कुणास ठाऊक! असा विचार मनात आला आणि पुढील सुंदर ओळी लिहिल्या गेल्या--

*ने मजसी ने परत मातृभूमीला*
*सागरा प्राण तळमळला ॥*

अरे! तू माझ्या आईचे चरण धूतोस. मी जेव्हा तिला सोडून निघालो तेव्हा तू तिला आश्वासन दिलेस की याला शिकवून, पढवून, बाहेरचे जग दाखवून लवकरच परत आणीन. पण हाय ही तर मोठी फसवणूकच झाली. माझे शिक्षण आता माझ्या मातृभूमीच्या कसे उपयोगी पडणार! या जगात दुसरे मला काही नको, माझी मातृभूमी हवी! सागरा, तुला तुझ्या पत्नीची शपथ आहे, नदीची शपथ आहे, आम्हा मायलेकरांची ताटातूट

घडवू नकोस ! दुष्टा हसतोस काय ! या आंग्लभूमीच्या बळावर ऐट दाखवतोस काय ? माझी आई काही कमी नाही. तिच्या एका मुलाचे नाव अगस्ती आहे. त्याने तुला सहज पिऊन टाकले होते. " सागरा प्राण तळमळला ! " मराठीतील ही एक अमर कविता आहे.

: १८ :

सावरकर अतिशय आजारी पडले. त्यांना न्युमोनिया झाला. डॉ. मुथु नावाचे एक मद्रासी हिंदू वेल्समध्ये रुग्णालय चालवीत होते. ते सावरकरांना आपल्या रुग्णालयात घेऊन गेले. औषध, खाणे, पिणे सगळा खर्च त्यांनी स्वतः सोसला.

थोडेसे बरे वाटल्यावर सावरकरांच्या मित्रांनी त्यांना विश्रांतीसाठी फ्रान्सला न्यावयाचे ठरविले. १९१० च्या जानेवारीत ते फ्रान्सला आले. विश्रांतीसाठी ते आले होते खरे पण त्यांची उद्योगप्रियता त्यांना स्वस्थ थोडीच बसू देणार होती ! डॉक्टरांकडून त्यांनी दोन तास काम करण्याची परवानगी मागून घेतली आणि त्या वेळात ते नियमितपणे " शिखांचा इतिहास " हा मराठी ग्रंथ लिहू लागले. तो उत्तम वठावा म्हणून ते गुरुमुखी लिपी शिकले. "ग्रंथसाहेबा"चे तर त्यांनी अध्ययन केलेच. पण शिख पंथावरील इतर शेकडो ग्रंथ वाचले.

इतक्या परिश्रमानंतर " शिखांचा इतिहास " तयार झाला. नेहमीप्रमाणे इंग्रज सरकार जप्त करील ही भीती

होतीच. सावधगिरी म्हणून या ग्रंथाच्या तीन हस्तलिखित प्रती करण्यात आल्या. एक प्रत पोस्टाने पाठविण्यात आली ती सरकारने जप्त केली. दुसरी एका मित्राबरोबर पाठविण्यात आली. पण झडतीच्या भीतीने त्याने ती समुद्राला अर्पण केली. तिसरी प्रत पॅरिसमध्ये कामाबाईजवळ ठेवण्यात आली. तिचे काय झाले कोणास ठाऊक नाही. इतका अभ्यास करून लिहिलेला तो सुंदर ग्रंथ पण अप्रकाशित स्थितीतच नाहीसा झाला.

हातात घेतलेले एक काम पूर्ण केल्याचे त्यांना समाधान लाभले. प्रकृतिही थोडी सुधारली. पण आता मन त्रास देऊ लागले. पूर्वी एका कामात गुंतले होते. आता मोकळे झाले. अनेक प्रकारचे विचार त्यात गोंधळ घालू लागले. रोज भयानक बातम्या येत होत्या.

नाशिक कटात त्यांचे अनेक बालमित्र पकडले गेले होते. वडील भाऊ काळ्यापाण्यावर गेले होते. लहान भाऊ नारायण, त्यालाही सरकारने पकडले होते. सरकार त्या सगळ्यांना खूप छळत होते. मारणे, ठोकणे, घरदार जप्त करणे ही तर अगदी साधी गोष्ट होती. सावरकरांच्या डोळ्यासमोर ती सगळी चित्रे नाचू लागली आणि त्यांचे मन त्यांना म्हणू लागले, " ते सगळे तिकडे भयानक छळ सोसत आहेत आणि तू आपला फ्रान्समध्ये सुरक्षित बसला आहेस हे काही योग्य नव्हे. तू त्यांचा पुढारी म्हणवितोस ना ? मग छळ सोसण्यासही पुढे हवास. चल हिंदुस्थानात ! "

साधक बाधक विचार करून शेवटी सावरकरांनी तावडतोब हिंदुस्थानात परतण्याचे ठरविले आणि आपल्या मित्रांना त्यांनी तो बेत सांगितला.

पॅरिसमधील त्यांचे मित्र चकित झाले. पण त्यांनी सावरकरांची मनःस्थिती ओळखली. थोडा वेळ त्यांनी जाऊ दिला. सावरकरांची मनःस्थिती जरा शांत झाल्याचे पाहून त्यांनी तो विषय काढला. शामजी कृष्णवर्मांनी मोठ्या प्रेमळपणाने त्यांना समजाविले. सावरकरांनीही आपले विचार मांडले. शेवटी असे ठरले की त्यांनी इंग्लंडमध्ये जावे.

ठरलेला दिवस जवळ आला. इंग्लंडमध्ये गेल्याबरोबर ते पकडले जातील हे सर्वांना स्पष्ट दिसत होते. निरोप देताना सगळ्यांची अंतःकरणे भरून आली.

: १९ :

रविवार दिनांक १३ मार्च १९१० रोजी रात्री सावरकर, इंग्लंडात आले. व्हिक्टोरिया स्टेशनवर ते उतरताक्षणीच पोलिस अधिकारी त्यांच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांनी सावरकरांना "वॉरंट" दाखविले. हिंदुस्थानात राजद्रोहाचा गुन्हा केल्याचा व खुनाला मदत केल्याचा सावरकरांवर आरोप असून ते पळून गेलेले असल्यामुळे त्यांना या आदेशानुसार पकडण्यात यावे असा त्या वॉरंटमधील मजकूर होता. सावरकर पोलीस अधिकाऱ्याबरोबर चालू लागले. त्यांना ठाण्यावर नेण्यात आले. त्यांच्या सामानाची झडती घेण्यात

आली. सगळ्या वस्तूंची नोंद करून घेऊन सावरकरांना कोठडीत डांबण्यात आले.

या पोलिस चौकीवर असताना सावरकरांनी अनेक पत्रे गुपचुप बाहेर पाठविली. बाहेरचीही आत आली. सावरकरांना कोर्टात नेता-आणताना एकदा त्यांना सोडवून पळवून नेण्याचा प्रयत्नही त्यांच्या मित्रांनी केला पण तो यशस्वी झाला नाही. लवकरच त्याना ब्रिक्स्टनच्या तुरुंगात अधिक बंदोबस्ताने ठेवण्यात आले.

काही तारखा ढकलल्या गेल्या नंतर कोर्टाचे काम सुरु झाले. सावरकरांचे प्रकरण हिन्दुस्थानातील न्यायालयापुढे चालवायचे की इंग्लंडमधील न्यायालयापुढे चालवायचे हा न्यायाधीशापुढे पहिला प्रश्न होता. त्यावर दोन्ही पक्षांचा बराच वाद झाला.

इंग्लंडमध्ये खटला चालला असता तर न्यायाचे काम चांगले झाले असते. दडपादडपी तितकी झाली नसती. जगातील सगळ्या वर्तमानपत्रात लहानमोठ्या बातम्या प्रसिद्ध झाल्या असत्या. सावरकरांना आणि त्यांच्या मित्रांना हेच पाहिजे होते. आणि इंग्रज सरकारला हे मुळीच नको होते. अर्थात सरकारच्या इच्छेप्रमाणे न्यायाधीशाने न्याय दिला. सावरकरांनी हिन्दुस्थानात गुन्हे केले आहेत तेव्हा त्यांचा खटला हिन्दुस्थानातील न्यायालयापुढेच चालावा असा न्यायाधीशाने निर्णय दिला. त्यांच्या संबंधीचे सगळे कागद-पत्र हिन्दुस्थानात पाठविण्यात आले. आणि दिनांक १ जुलै

१९१० रोजी सावरकरांनाही " मोरिया " नावाच्या बोटीवर चढविण्यात आले.

: २० :

मोरिया बोट चालू झाली. सावरकरांच्या डोक्यातही विचारचक्रे फिरू लागली. जाता-येता ते बोटीचे निरीक्षण करू लागले. कोठून कसे निसटता येईल त्याचा अंदाज घेऊ लागले. बोटीच्या हलण्यामुळे अनेक उतारुंच्या झोकांड्या जात होत्या. आपलीही अशीच झोकांडी गेली असे दाखवून त्यानी बोटीच्या 'पोर्ट होल' चे माप किती आहे ते मोजून घेतले. लवकरच त्यानी आपल्या मनाशी निश्चय केला की हाच आपल्या सुटकेचा मार्ग आहे.

मग ते अगदी आनंदाने बोटीवर वावरू लागले. त्याना दुसऱ्या वर्गाच्या उतारूंबरोबर जेवायला बसविण्यात येई. त्यावेळी ते आसपासच्या मंडळीशी मोकळेपणाने गप्पा मारीत; खदखदून हसत. त्यांचे वागणे पाहून लोक चकीत होत. एकमेकांना ते बोलून दाखवीत–" वारे वीर ! समोर मृत्यूने जबडा उघडला आहे पण कसा आनंदी आहे पहा ! हा खरा नरसिंह आहे ! ! "

मार्सेलिस बंदर आले. बोट थांबली. बोटीच्या यंत्रात काही बिघाड झाल्यामुळे ती अधिक थांबणार होती. किनाराही जवळ होता. बस, हीच संधी. सावरकरांनी बेत नक्की केला. पार्कर आणि पॉवर यांचे इंग्रज पहारेकरी रात्रंदिवस डोळ्यात

तेल घालून पहारा देत होते. पण सावरकरांनी त्यांच्याही हातावर तुरी दिल्या. शौच्यास जाण्यासाठी ते निघाले. पहारेकरी बरोबर होतेच. शौच्यकूपात शिरताच त्यांनी दार घट्ट लावून घेतले. काचातून दिसू नये म्हणून त्यावर अंगातला कोट काढून फेकला आणि त्यांनी पोर्टहोलवर उडी मारली. अंग खरचटते आहे, ओरखडे निघताहेत, पण त्याचे त्यांना भान नव्हते. शरीराचा शक्यतितका संकोच त्यांनी करून घेतला आणि ते पुढे सरकले. चामडी बरीच सोलली गेली पण युक्ती सफल झाली. शरीर समुद्रात झोकले गेले.



नाशिकच्या गोदावरीच्या पुरात पोहणारा तो वीर समुद्र पोहू लागला. दहा–पंधरा मिनिटांत त्याने तीर गाठले पण दुर्दैव आड आले. फ्रेंच शिपायाने दगा दिला. सावरकर पकडले गेले पुन्हा त्यांना मोरिया बोटीवर आणण्यात आले.

: २१ :

बोटीवरील अधिकाऱ्यांनी आता सावरकरांना खूपच कडक बंदोबस्तात ठेवले. ते चिडून त्यांचा छळ करू लागले. त्यांना शिव्या देऊ लागले. मारहाण करू लागले. शेवटी तशाही स्थितीत सावरकरांनी नरसिंहाचे रूप धारण केले. ते आपल्या अधिकाऱ्यांना दरडावून म्हणाले, "लक्षात ठेवा आम्ही घराबाहेर पडलो तेच मुळी तळहातावर शिर घेऊन बाहेर पडलो. तुम्हा सगळ्यांशी कदाचित मला लढता येणार नाही पण वेळ आली तर एकाचा तरी मुडदा पाडल्याशिवाय मी राहणार नाही. आम्ही बॉम्ब-गोळ्यांशी खेळणारे लोक, आम्हांला मृत्यूचे भय नाही. तुम्ही मात्र सांभाळा ! या जरबेने चांगलेच काम केले.

सावरकरांचे पाठांतर खूप होते. ते या काळात त्यांना फार उपयोगी पडले. मोरोपंतांच्या हजारो आर्यांनी त्यांचे मनोरंजन केले. योगवसिष्ठाने त्याना धीर दिला. श्रीमद्-भगवत गीतेने त्यांचे मन विराट केले. त्याही परिस्थितीत त्यांचे कवितालेखन चालूच होते —

*अनादि मी, अवध्य मी, अनंत मी भला*
*जिंकले रिपु कवण असा जगति जन्मला ॥*
*धर्मरक्षणार्थ तो शस्त्रजारणीं*
*अट्टहास खड्गपाणी करि जई दणीं*
*न देह अग्नि जाळितो न खड्ग भंगितो*
*मलाचि भिउनि भ्याड रिपू पळत सूटतो*
*तयाचि या मृत्युच्या भये*
*खुळा हा शत्रु मजासि भिववु ये ।*
*अनादि मी, अवध्य मी, अनंत मी भला*
*जिंकिल रिपु कवण असा जगति जन्मला ॥*

'मोरिया' बोट एडन बंदराजवळ आली. हवेत भयंकर उष्णता होती. सावरकरांना काही दिवसांपासून दम्याची व्यथा सुरू झाली होती. ती यावेळी उफाळून आली. त्यांना अतिशय त्रास होऊ लागला. जीव गुदमरू लागला. इंग्लंडच्या गारठलेल्या दगडी तुरुंगात जितका त्रास झाला नाही, तितका आता त्याना या दम्याने त्रास द्यायला सुरवात केली. नको हे जगणे असे त्याना झाले. काही तरी करून जिणे संपवावे, आत्महत्या करावी असे त्याना वाटू लागले. पण एक दिवसच ही मनःस्थिती राहिली. ते लगेच सावरले. मनावर आलेली उदास छाया गेली.

२२ जुलै १९१० रोजी त्यांना मुंबईस आणण्यात आले. तेथून बंद डब्यातून त्यांना नाशिकला नेण्यात आले.

: २२ :

मुंबई येथे विशेष न्यायालय निर्माण करण्यात आले. सावरकरांचे प्रकरण त्याच्यापुढे चालू झाले. वकीलांनी हरकत घेतली. सावरकरांच्या मित्रांनी जागतिक कीर्तीच्या वर्तमानपत्रात लेख लिहिले. सावरकर फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरल्यानंतर इंग्रज शिपायांनी त्यांना तेथे पकडणे आंतरराष्ट्रीय नियमांच्या विरुद्ध होते. फ्रान्सच्या सार्वभौमतेला बाधा आणणारे हे कृत्य होते.

मुद्दा महत्त्वाचा होता. खरा होता, पण त्याच्या बाजूने शक्ती नव्हती. या जगात शक्ती असल्याशिवाय सत्याला मान मिळत नाही. जेव्हा जास्त आरडाओरडा झाला तेव्हा हेग येथे एक जागतिक न्यायाधीश मंडळ नेमण्यात आले. त्याने लुटुपुटीची चौकशी केली आणि प्रकरण दडपून टाकले.

इकडे नाशिक कटाचा खटला चालूच होता. २४ डिसेंबर १९१० रोजी त्याचा निकाल लागला. विनायकराव सावरकराना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली. दुसऱ्या आरोपांचे प्रकरण चालूच होते. ३० जानेवारी १९११ रोजी निकाल लागला. त्यांना जन्मठेपेची दुसरी शिक्षा सांगण्यात आली.

जन्मठेप म्हणजे काळेपाणी ! नुसते नाव उच्चारताच लोक घाबरत असत. तिथे या वीराला दोन जन्मठेपीच्या शिक्षा मिळाल्या. हाय रे दैवा ! भारत माता कळवळली. माझ्या या

लाडक्या पुत्राची किती तीव्र बुद्धिमत्ता पण ती चार भिंतींमध्ये सडणार ! केवढे प्रचंड कर्तृत्व ! अचाट संशोधन ! प्रेताला उठवील असे वक्तृत्व ! भावनांना उधाण भरती आणील अशी प्रतिभा पण त्या सगळ्यांभोवती आता लोखंडी बेड्या खण-खणणार ! भारत माता पारतंत्र्यात होती. अश्रू ढाळण्यापलिकडे ती काय करू शकत होती !

दोन जन्मठेपेची शिक्षा ! पन्नास वर्षांचे काळे पाणी ? ज्यांनी ऐकले ते हळहळले, रडले. पण ज्यांना शिक्षा झाली ते वीर डगमगले नाहीत. हसतमुखाने त्यांनी ती शिक्षा स्वीकारली. इतकेच नव्हे तर शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशासमोरच अभिनव भारताच्या त्या महान वीरांनी ठणकावून गर्जना केली, “ स्वातंत्र्य लक्ष्मी की जय ! ”

: २३ :

सावरकराना आता भायखळ्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे त्यांनी सप्तर्षि ही कविता लिहिली. गुरु गोविंदसिंहावरील काव्यही त्यांनी येथेच लिहिले

पुढे त्यांना ठाणे तुरुंगात ठेवण्यात आले. अंदमानला न्यावयाचे सगळे कैदी तेथे आणण्यात आले होते. खुनी, डाकू, दरोडेखोर त्यांच्या मध्येच बॅरिस्टर विनायकराव सावरकर ! ठरल्या दिवशी सगळ्यांना गाडीत बसविण्यात आले. सरकारने खूप गुप्तता राखली होती. तरीही बातमी फुटलीच. अनेक स्टेशनावर त्यांचे दर्शन घेण्यासाठी लोक गोळा झाले.

ठिकठिकाणचे युरोपियन लोकसुद्धा त्यांना पहायला येत. अखेरीस गाडी मद्रासला पोहोचली.

दुसऱ्याच दिवशी त्याना "महाराजा" बोटीवर नेण्यात आले. त्यांच्या भावना उचंबळून आल्या. पुन्हा या देशाचे दर्शन आपल्याला होते की नाही कोणास ठाऊक! पन्नास वर्षे काढायची आहेत. आणि तीही अंदमानात. तेथील भयंकर हवामान आणि त्याहून भयानक तेथील तुरुंग! आता कसचा मी परत येणार! आपुले मरण पाहिले म्या डोळा म्हणतात त्याप्रमाणे आपल्या तिरडीवर आपणच चढावे तसे हे "महाराजा" बोटीवर त्यांचे पाऊल ठेवणे होते.

भारतवर्षाचे मानचित्र जर समोर ठेवले तर मद्रासच्या पूर्वेला आणि कलकत्त्याच्या दक्षिणेला सहा सातशे मैलावर लहान लहान बेटे दिसतील त्यातील एका बेटाला अंदमान हे नाव आहे. इंग्रजांच्या राजवटीत जन्मठेपेचे कैदी या बेटावर पाठविले जात असत.

या बेटाची हवा मोठी विचित्र होती. कधी खूप उष्णता तर कधी धो धो पाऊस. जिकडे तिकडे अरण्य माजले होते. डबकी साचलेली होती. डास आणि मच्छर यांनी सगळे बेट अगदी भरले होते. चिखलात आणि झाडांच्या पानात हजारो जळवा असत. कैद्यांना लाकडे तोडण्यासाठी जंगलात नेण्यात येई तेव्हा या जळवा त्यांच्या अंगाला चिकटत आणि त्यांचे रक्त शोषून घेत. त्यामुळे मी मी म्हणणारे खुनी डाकू सुद्धा या जळवांना भीत असत.

झाडे तोडणे, लाकडे कापणे, नारळाचे तेल काढणे, काथ्या कुटणे, चहाचे मळ्यांत अथवा भाजीच्या बागेत गवत काढणे, पाने फळे तोडणे, अशी कामे कैद्यांकडून करविली जात असत.

येथील तुरुंग खूप मोठा व बळकट बांधणीचा होता. तुरुंगाच्या मुख्य अधिकाऱ्याचे नाव बारी होते. हा आयरिश होता. याची शिस्त फार कडक असे. त्याला आणखी इंग्रज सरकारने सूचना पाठविल्या की " हे राजकीय बंदी अट्टल बदमाष आहेत. यांची चांगली खोड मोडेल असे याना वागवावे. "

लगेच काही दुय्यम अधिकारी बदलण्यात आले. सावरकरांच्या स्वागतासाठी छळणारे राक्षस तयार होते.

## : २४ :

दिनांक ४ जुलै १९११ रोजी सावरकरांची बोट अंदमानात पोहोचली. " चलो उठाव बिस्तरा " अशी आज्ञा सुटली. कैद्यांनी आपापल्या वळकट्या उचलल्या. सावरकरांनीही उचलली. पायात बेड्या खणखणत होत्या. ते अनवाणी चालत होते. तुरुंगाचा दरवाजा उघडला गेला. कैदी आत आले. दरवाजा बंद झाला. बाहेरच्या जगाशी संबंध तुटला.

बारी साहेबांशी त्यांची भेट झाली; बारी साहेब त्यांच्याशी काही समजावणीच्या स्वरात तर काही दटावणीच्या स्वरात बोलला. शेवटी तो म्हणाला, " येथील नियम तुम्ही नीटपणे

पाळले म्हणजे इतर गोष्टींशी मला काही कर्तव्य नाही. नियमांविरुद्ध वागाल तर मात्र मला शिक्षा करावी लागेल."

सावरकरांना सात क्रमांकाच्या चाळीच्या मजल्यावरील कोठडीत बंद करून ठेवण्याची बारीने आज्ञा दिली. ती सगळी चाळ रिकामी करण्यात आली होती. ज्या वार्डरांच्या हाती त्यांना सोपविले होते. ते सर्व निर्ढावलेले पठाण होते.

काही काम नाही. वाचायला पुस्तक नाही. बोलायला माणूस नाही. अशा स्थितीत सावरकरांचे मन सहजच काव्याकडे वळले. पण कागद पेन्सिल नाही. लेखनसाहित्य काही नाही. मग लिहायचे कशावर ? मनाच्या पाटीवर. अनुष्टुप वृत्तातील 'कमला' काव्य तयार होऊ लागले. श्लोक रचायचे आणि पाठ करायचे असा त्यांनी क्रम ठेवला.

विनायकरावांना आता काथ्याकुटण्याचे काम देण्यात आले. त्यांच्या हाताची सालटी निघू लागली. हात रक्तबंबाळ होऊ लागले. पण त्याना सूट मिळाली नाही. त्यांचे वडील बंधू गणेशपंत अंदमानातच होते. हळूहळू गुप्त रीतीने त्यांची बातमी कळली. ते आजारी होते. अर्धशिशि, अमांश वगैरे व्याधींनी आजारी असूनही त्यांना घाण्याला जुंपले जात होते. ते सर्व ऐकून विनायकरावांना अतिशय दुःख झाले. दोन महिन्यानंतर दोघा भावांची चोरून भेट झाली. "तात्या तूं इथे कसा आलास ?" एवढेच शब्द बाबांच्या तोंडून बाहेर पडले. भावनांच्या कल्लोळानी दोघांचीही अंतःकरणे भरून गेली. गुपित फुटेल म्हणून वार्डरांनी त्याना दूर केले.

थोड्याच दिवसांनी बारीने विनायकरावानाही तेलघाण्याला जुंपले. लंगोटी नेसून सकाळी दहावाजेपर्यंत ते काम करीत. सारखे फिरवीत राहिल्याने चक्कर येऊ लागत. सगळे अंग ठणकू लागे. सकाळी उठले तरी अंग आंबलेले असे. एक दिवस तर काम करता करताच त्यांना मूर्च्छा आली. शरीर थकविणारे, मनाला हताश करणारे असे ते भयंकर काम होते.

पण विनायकराव वाइटातूनही काही चांगले काढीत असत. तेल घाण्यावर गेल्याने अनेक राजकीय बंदीशी त्यांचा संबंध आला. त्यांनी लगेच राजबंदीच्या संघटनेची सुरवात केली.

राजबंद्यांचा छळ वाढत होता. विनायकराव अनेकांना प्रेमळ उपदेश देत होते. त्यांच्या मनात आशेचे रोपटे लावीत होते. पण ते तेलघाण्याचे काम, रुक्ष जेवण, नरराक्षस बारी सगळे इतके भयंकर होते की शेवटी इंदुभूषणने आत्महत्या केली, उल्हासकर दत्त वेडा झाला.

या गोष्टीची बारीसाहेब जेव्हा थट्टा उडवू लागला तेव्हा सावरकरानी त्याला चांगलेच चापले "सध्याची स्थिती बदलली नाही तर राजबंदींना संप पुकारावा लागेल हे लक्षात ठेवा."

आणि मग एकदा त्यांच्या जवळ दुसऱ्या कैद्याने पाठविलेली चिठ्ठी सापडली. लगेच त्यांना सात दिवसांची हातकडीची शिक्षा देण्यात आली. सकाळी सहा पासून संध्याकाळी चार वाजेपर्यंत उंच टांगलेल्या कडीत हात अडकवून त्यांना उभे रहावे लागे.

आपल्याला काही सवलती मिळाव्या म्हणून सावरकरांनी पुष्कळ अर्ज केले. पण ते सर्व नामंजूर करण्यात आले. काथ्या कुटणे, दोऱ्या वळणे, संप, लहानमोठ्या शिक्षा, रोजच्या नव्या कटकटी चालू होत्या. तरीही "कमला" काव्याची रचना वेगाने प्रगती करीत होती. विटकरीच्या तुकड्याने ते भिंतीवर लिहून ठेवीत. मग तो सगळा भाग लवकर पाठ करीत म्हणजे कोठडी बदलली तर काव्य जिभेवर तयार असे.



भिंतीवर लिहिण्याने कित्येक नव्या नव्या गोष्टी सुरू झाल्या. कोठड्यांच्या भिंती शाळांचे काम करू लागल्या. राजबंद्यांना

शिक्षण मिळू लागले. हळू हळू त्यानी एक सांकेतिक भाषा तयार केली. बेड्यांच्या ठोक्यावर ती बसविली होती. सावरकरांनी तेथे शुद्धिकार्यही केले. कोणी मुसलमान थाळीला शिवला की हिंदू बाटला असे आजपर्यंत चालत होते. माणूस उपाशी किती दिवस रहाणार? शेवटी बापडा मुसलमान होत असे. हिंदूही त्याला दूर लोटीत असत. सावरकरांनी या प्रकाराला आळा घातला. अन्नाला शिवल्याने काही एक होत नाही. असे त्यानी सर्वांच्या मनात ठसविले. पारडे फिरले. मुसलमानांची संख्या कमी होऊ लागली. पूर्वी फसविले गेलेले अनेक हिंदूंच्या रांगेत येऊन बसू लागले.

इ. स. १९१४ चे युद्ध सुरू झाले. ते जागतिक युद्ध होते. ते चार वर्षे चालले. जर्मनीने हिन्दुस्थानातील अनेक तरुणांच्या मनात आशा निर्माण केली. जर्मनीचे "एम्डन" जहाज हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर येऊन खळबळ निर्माण करून गेले. पण जर्मनी हारला. इंग्रज जिंकले. पुन्हा दात ओठ खाऊन ते राज्य करू लागले. सूड उगवू लागले. शेकडो क्रांतिकारक अंदमानात पोहोचले.

१९१८ च्या शेवटी शेवटी विनायकराव अतिशय आजारी झाले. जगतात की मरतात अशी स्थिती झाली. त्यातच येसू वहिनींच्या मृत्यूची बातमी त्यांना कळली. त्यांना अतिशय दुःख झाले. त्यांच्या तोंडून उद्गार बाहेर पडला, "आता सुटून तरी काय उपयोग. माझ्या जीवनातील अर्धाअधिक आनंद आता नाहीसा झाला आहे!" १९१९ च्या जून महिन्यात नारायणराव

सावरकर अंदमानात आपल्या बंधूंना भेटण्यासाठी आले. जवळ जवळ बारा तेरा वर्षांनी तिथे बंधू एकत्र आले. एकमेकांची दशा पाहून आनंदापेक्षा दुःखच अधिक झाले. त्यावेळी विनायकरावांचे वजन ९९ पौंड होते.

विनायकरावांच्या शरीरात काहीच त्राण राहिले नव्हते. मन मात्र खंबीर होते. काव्यरचना हा मोठाच विरंगुळा त्याना लाभला होता. कवितेचे चरण जुळू लागले की ते जणु एखाद्या नव्याच जगात प्रवेश करीत. कमला, गोमांतक, मूर्तीदुजीती, महासागर यासारखी दीर्घ काव्ये आणि चांदोबा चांदोबा भागलास का, जगन्नाथाचा रथोत्सव, आकांक्षा यासारखी कितीतरी सुंदर स्फुट काव्ये, त्यानी अंदमनाच्या त्या भीषण वातावरणात लिहिली. काव्याच्या विमानात बसले की अन्दमानाच्या नरकपुरीतून ते झटदिशी स्वर्गातील आनंदपुरीत येऊन पोहोचत.

आतून सुटकेकरिता प्रयत्न होत होते. बाहेरची प्रयत्न होत होते. सगळ्या देशभर लक्षावधी सह्या होऊन सावरकरांच्या सुटकेची मागणी जनतेने केली. थोडे थोडे यश येऊ लागले. सरकारने सावरकरबंधूंना हिंदुस्थानात आणावयाचे ठरविले. अंदमानचे सगळे कैदी नियम धाब्यावर बसवून गोळा झाले. त्यांनी सावरकर बंधूंना निरोप दिला. एका वार्डरने सुंदर चाफ्याच्या माळा त्यांच्या गळ्यात घातल्या. २१ जानेवारी १९२१ रोजी सावरकरबंधूंना त्या यमनगरीतून बाहेर काढण्यात आले. त्यांना बंगालमध्ये अलीपूरच्या तुरुंगात

ठेवण्यात आले. येथे ते पंधरा दिवस होते. त्यानंतर गणेश पंतांना विजापुर तुरुंगात नेण्यात आले व विनायकरावांना रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. १९२२ साली सरकारने गणेशपंताना सोडले. ६ जानेवारी १९२४ रोजी सरकारने विनायकरावांना कैदेतून सोडले. पण रत्नागिरी जिल्हा सोडून जायचे नाही असा आदेश त्यांना देण्यात आला. ६ जानेवारी १९२४ ते ९ मे १९३७ म्हणजे जवळजवळ तेरा वर्षे ते रत्नागिरीला स्थानबद्ध राहिले. त्या काळात त्यांनी अनेक सामाजिक कार्ये केली. ते निरनिराळया साप्ताहिकात आणि मासिकात विपुल लेखन करू लागले. अस्पृश्यतेच्या विरुद्ध त्यांनी मोहीम उघडली. रत्नागिरीत सगळ्यांना खुले राहील असे पतितपावन राममंदिर त्यानी बांधविले. अनेक प्रकारचा विरोध सहन करून त्यांनी बाटलेल्या लोकांना हिंदुधर्मात घेतले.

बॅरिस्टर जम्नादास मेहता आदी मंडळींच्या प्रयत्नाने शेवटी १९३७ च्या मे महिन्यात सावरकरांवरील सर्व निर्बंध सरकारने काढून घेतले. ते मुंबईला स्थायिक झाले. रत्नागिरी सोडताच त्यांनी सार्वजनिक राजकारणी जीवनाला सुरवात केली. १९३७ साली अहमदाबाद येथील हिंदुमहासभेच्या अध्यक्ष-स्थानी त्यांची निवड झाली. १९४३ पर्यंत लागोपाठ सहावेळा तेच सभेचे अध्यक्ष राहिले. सैन्यात शिरण्याचे महत्व त्यांनी हिंदुसमाजाला पटवून दिले. अस्पृश्यांबरोबर प्रचंड प्रीतिभोजने त्यानी घडवून आणली. देशभर तुफानी दौरे केले. त्यांचे

वक्तृत्व ऐकत लक्षावधि लोक तासन्तास तटस्थ बसत असत. आणि देशभक्तीच्या भावनेने भारले जात असत.

स्वराज्य प्राप्तीच्यावेळी पाकिस्तानच्या निर्मितीचा त्यांनी घोर विरोध केला. स्वराज्य प्राप्तीनंतर त्यांनी सैनिकबळ वाढविण्याचे महत्व समजावून सांगितले. त्यांची अनेक भविष्ये खरी ठरली. त्यांचे म्हणणे न ऐकल्यामुळे भारतावर अनेक संकटे आली. पन्नास वर्षे, शंभर वर्षे पुढचे अचूक पहाण्याची शक्ती फक्त वीर सावरकरांच्याच ठायी होती, प्रत्येक विषयाकडे बुद्धिवादी दृष्टिकोणातून पहाण्याची त्यांची वृत्ती होती. त्यांची भाषणे अती प्रभावी आणि प्रेरक असत. पण या दुर्दैवी देशात त्यांच्या गुणांचा खरा उपयोग होऊ शकला नाही.

: २५ :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वराज्य मिळाले. पण ते खंडित स्वराज्य होते. रक्ताच्या नद्या वहात होत्या. घरांना आगी लागत होत्या. सर्व प्रकारचे अत्याचार होत होते. भारत मातेचे दोन्ही हात जणु कापले गेले. अर्धा पंजाब गेला. अर्धा बंगाल गेला. पाकिस्तान निर्माण झाले. असे स्वराज्य आले.

घरदार नष्ट होऊन भिकारी नाडलेल्या, छळलेल्या लक्षावधि हिंदूंचे तांडे सिंधमधून, पंजाबमधून, बंगालमधून भारतात रडत ओरडत येऊ लागले. त्यातच काश्मीरवर पाकिस्तानी

हल्लेखोरांनी पहिले आक्रमण केले. केंद्रिय सरकारने पाकिस्तानला द्यावयाचे पंचावन्न कोट रुपये अडवून ठवले. केंद्रिय सरकारने स्पष्ट बजावले की तुम्ही ज्याअर्थी काश्मीरवरील आक्रमण मागे घेत नाही त्याअर्थी आम्ही तुम्हाला पंचावन्न कोट रुपये देत नाही. पण भारताने काहीही अ घालता पाकिस्तानला पंचावन्न कोट रुपये द्यावेत असा गांधीजींनी आग्रह धरला. त्यासाठी त्यांनी उपवासही घोषित केला. या त्यांच्या नको त्या कृत्याची अनेकांना चीड आली. देशात विचित्र वातावरण निर्माण झाले.

: २६ :

३० जानेवारी १९४८ ला गांधीजींची हत्या झाली. हत्या करणारा तिथेच पकडला गेला. देशभर वेडाचे वारे वाहू लागले. लोकांची डोकी फिरली. भित्र्या लोकांना देशभर कट दिसू लागले. मतलबी लोकांना सुवर्णसंधि दिसू लागली. कोणी खाजगी हेवेदावे साधले. कोणी सरणावर पोळ्या भाजल्या. त्याच धामधुमीत दिनांक ५ फेब्रुवारी १९४८ रोजी विनायकराव सावरकरांनाही पकडण्यात आले.

लोक हळहळले. अरेरे, काय या देशभक्ताची स्थिती! काल इंग्रजांचे राज्य होते तेव्हा वर्षानुवर्षे हा महापुरुष तुरुंगात खितपत पडला. आज आता स्वराज्य आले तरी याच्या कपाळी तुरुंगच असावा ना? दैवा तुझी गति विचित्र आहे!

२७ मे १९४८ रोजी दिल्लीतील खटला सुरू झाला. लोकांनी लाखो रुपये जमा केले. सावरकरांसाठी बुद्धिमान वकील विशेष परिश्रम घेऊ लागले. शेवटी खटल्याचा निर्णय घोषित करण्यात आला. विनायकराव सावरकर निर्दोष सुटले. दिनांक १० फेब्रुवारी १९४९ रोजी त्यांना मुक्त करण्यात आले.

मुंबईला येऊन ते शांतपणे राहू लागले. त्यांचे आता सहासष्ट वर्षांचे वय झाले होते. त्यांना एकांत आवडू लागला. डिसेंबर १९४९ मध्ये ते हिंदुमहासभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनाला गेले होते. परंतु एरवी त्यांना भाषणे देण्याचा कंटाळा वाटू लागला. कोणी त्यांना विचारायला गेले तर ते म्हणत. "पुरे झाले आता बोलणे. मी इतके लिहून ठेवले आहे की त्याच्या पलीकडे मला कांही एक सांगायचे नाही."

इ. स. १९५२ मध्ये 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेचा सांगता समारंभ पुण्याला साजरा करण्यात आला. सर्व क्रांतिकारकांचे गुरु वीर विनायकराव सावरकर हेच त्या प्रसंगी मुख्य वक्ते होते. त्यांची प्रकृती ठीक नव्हती. ते अधिक बोलणार नव्हते. पण एकदा प्रारंभ केला आणि मग तासभर ते बोलत राहिले. ते म्हणाले, "आपला देश तीन चतुर्थांश का होईना स्वतंत्र झाला. मला त्यात आनंद आहे. आपणात धमक असेल तर उरलेला एक चतुर्थांशही स्वतंत्र होईल. आज सर्वप्रथम आवश्यकता असेल तर

बलाची. सेना, विद्या, विज्ञान या सर्वांची वाढ करून आणि आपला देश बलवान करायला हवा."

## : २७ :

इ. स. १९५७ साली सगळ्या देशात १८५७ च्या क्रांतियुद्धाचा शताब्दी समारोह साजरा करण्यात आला. वीर सावरकरांना मुद्दाम दिल्लीला नेण्यात आले. तेथे त्यांचे १८५७ च्या क्रांतियुद्धावर भाषण झाले. त्यांनी तात्या टोपे, राणी लक्ष्मी, नानासाहेब, बहादुरशहा आदी वीरांच्या कथा सांगून त्यांना श्रद्धांजलि अर्पण केली. ब्रिटिश म्युझियममध्ये बसून पाहिलेले पुरावे त्यांनी जनतेला ऐकविले आणि १८५७ मधील पराक्रमांची जिवंत चित्रे डोळ्यापुढे उभी केली.

विनायकराव आता खूपच थकले. सन १९१० मध्ये त्याना ५० वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाली. जणू मृत्युच्या जबड्यात दोनदोनदा शिरून ते बाहेर आले होते. म्हणून हिंदुमहासभेने "वीर–सावरकर मृत्युंजय समारंभ" साजरा केला.

इ. स. १९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने आणि केन्द्रीय शासनानेही त्याना मानधन देऊन त्यांचा गौरव केला. हे मानधन का देण्यात येत आहे असे विचारले असता शासनाने खणखणित उत्तर दिले की,

"आम्ही सावरकरांना स्वातंत्र्यवीर मानतो."

इतके वय झाल्यानंतर त्यांचे दौरे बंद झाले. त्यांची भाषणे बंद झाली. लेखन मात्र त्यांनी चालू ठेवले होते. १९६३ साली त्यांनी "भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने" हा सहाशे पृष्ठांचा ग्रंथ लिहिला. आत्मचरित्राचेही लेखन त्यांच्या वयाच्या मानाने मोठ्या वेगाने आणि नियमितपणे चालले होते.

८ नोव्हेंबर १९६३ रोजी विनायकरावांच्या पत्नि वारल्या. त्यांचे नाव यमुना होते. त्याना माई म्हणत असत. त्या माउलीने जीवनांत काय काय सहन केले हे तिचे तिलाच माहीत ! पतिविरह, दारिद्र्य, सामाजिक छळ यांच्याशी ती तपेच्या तपे झगडत राहिली. विनायकराव रत्नागिरीला आल्या पासून तिचा संसार सुरू झाला. पण त्यावेळी विनायकरावांची स्थिती भयंकर होती. उग्र बंदिवासामुळे त्यांच्या शरीर आणि मनःप्रकृतीत विचित्र कोपरे उत्पन्न झाले होते. यमुनाबाई त्या सर्व गोष्टींशी शांतपणे लढल्या. त्यानी पतीची शुश्रुषा केली. माई सावरकर म्हणजे सहनशीलतेची पराकोटी !

जीवनातील सहधर्मचारिणी सोडून गेली. वडील भाऊ बाबा १९४५ मध्येच वारले होते. धाकटा भाऊ नारायण याने १९५० साली इहलोकीची यात्रा संपविली होती. मुलगा विश्वास आपला संसार करीत होता. मुलगी चिपळूणकरांकडे दिली. तिचेही सगळे ठीक चालले होते. जीवनात सगळे काही पाहिले, अनुभविले आणि केले. आता पुरे हे जीवन—असा विचार सावरकरांच्या मनात घोळू लागला.

१९६४ च्या फेब्रुवारीमध्ये ते फार आजारी झाले. जवळ जवळ दोन वर्षे ते अंथरुणाला खिळले होते. मुंबईतील निष्णात डॉक्टर त्यांच्या सेवेला सदैव हजर असत. पण पुढे पुढे ते औषधालाही कंटाळले. आत्मसर्पण करण्याचा त्यानी निश्चय केला. ८३ वर्षे ते जगले होते. जीवनात त्यांना आता काहीही रस उरला नव्हता. महापुरुषांचा मार्ग त्यांनी स्वीकारला. आपण होऊन आपला देह मृत्यूच्या स्वाधीन करायचा असे त्यानी ठरविले. शंकराचार्य, कुमारील भट्ट एकनाथ, गोरांग महाप्रभु, तुकाराम रामदास स्वामी रामतीर्थ यानी असेच केले होते. सावरकरांनीही आत्मार्पण केले. त्यांनी अन्न सोडले. फळ नको, दूध नको आता काहीही नको. शेवटल्या वीस दिवसात पाण्याशिवाय त्यांनी काहीच घेतले नाही. दि. २६ फेब्रुवारी १९६ रोजी दुपारी ११ वाजून ३० मिनिटांनी त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली.

*धन्यो ऽहम । धन्यो ऽहम । कर्तव्यम् म न विद्यते किंचित्*
*धन्यो ऽहम । धन्यो ऽहम प्राप्तव्यम् सर्वमद्य संपन्नम्*

"मी धन्य आहे, मी धन्य आहे, करायचे असे काही एक कार्य उरले नाही. सगळ्या कर्तव्यातून मी मुक्त झालो. देशाचे, धर्माचे, गुरुचे, कुळाचे, सगळी ऋणे मी फेडली. मी धन्य आहे! मी धन्य आहे! जे काही मिळायचे ते सगळे मी मिळविले." असे म्हणत अत्यंत समाधानाने त्यांनी परलोकी गमन केले.

: २८ :

सावरकरांचे आयुष्य म्हणजे एक घनघोर युद्ध आहे. जीवनभर ते लढत राहिले. ते अन्यायाविरुद्ध लढले. तसेच अज्ञानाविरुद्धही लढले. भारताचे राजनैतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सर्व प्रकारचे जीवन सुधारावे म्हणून ते रात्रंदिवस झटत राहिले. त्यांचे जीवन म्हणजे त्यागाने आणि बलिदानाने भरेलला भरगच्च खजीना आहे. गेल्या शंभर वर्षांत अनेक महापुरुष होऊन गेले पण इतके चढउतार, इतके रोमहर्षक प्रसंग, इतकी धडपड आणि चिकाटी इतरत्र क्वचितच आढळते. त्यांच्या जीवनात बॉम्ब व पिस्तुले आहेत तर कोमल काव्येही आहेत. धबधब्यासारखी प्रचंड भाषणे आहेत तर आठवडेच्या आठवडे कोणाशीही बोलू न देणारी एकलकोंडीही आहे. सम्राटालाही हेवा वाटावा असा मान आहे तर भिकाऱ्यानेही कींव करावी असा अपमानही आहे. सावरकरांचे जीवन म्हणजे उत्तान, अद्भुत, रोमांचकारी नाट्यपूर्ण प्रसंगांनी भरलेले, वीर उदात्त आणि करुण रसाने ओतप्रोत असे एक महाकाव्य आहे.

केवढी कणखर त्यांची छाती असल ! जन्मभ ते सोशीत राहिले. वज्राघात झेलीत राहिले. तरीही हंसतमुखाने आणि जिद्दीने पुढे पावले टाकीत राहिले. तेजस्वी जीवनाचा, चिरंतन विचारांचा, अमर साहित्याचा विपुल ठेवा त्यांनी भारताच्या स्वाधीन केला. त्यांचे थोरवीविषयी एका वाक्यांत बोलायचे झाले तर–' झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हा. '

# द्रष्टे सावरकर

"धन्योऽहं कृतार्थोऽहं" म्हणत, लाखो लोकांकडून मानाचा मुजरा घेत स्वातंत्र्यवीर सावरकर निघून गेले. सावरकरांनी प्रज्वलित केलेली राष्ट्राभिमानाची ज्योत मात्र अखंड तेवत राहील.

सावरकरांची भविष्यवाणी प्रत्येक क्षेत्रात खरी ठरत आहे. कोणाच्याही रागलोभाची पर्वा न करता सावरकरांनी आपले विचार निर्भीडपणे मांडले. सावरकरांच्या दृष्टीची झेप फार मोठी होती. सावरकर श्रेष्ठ दर्जाचे द्रष्टे होते. त्यांनी वर्तविलेली राजकीय भविष्ये बिनचूक ठरली. सावरकरांना ज्यांनी पक्षाधतेने विरोध केला, तेच आज सावरकरांची मतप्रणाली प्रत्यक्षात आचरू लागले आहेत.

'रोटी बंदी' आणि "बेटी बंदी" तोडण्याचा पुरस्कार सावरकरांनी हिरीरीने केला. आज जातिभेद, प्रांतभेद झपाट्याने नाहीसे होत आहेत. एकजिनसी हिंदुसमाजाचे, हिंदुराष्ट्राचे स्वप्न साकार होण्याचा काळ आता फार दूर राहिलेला नाही. "तुम्ही आम्ही सकल हिंदू, बंधू बंधू" ही शिकवण हिंदूंना पटू लागलेली आहे.

"लेखण्या मोडा, बंदुका घ्या" अशी गर्जना सावरकरांनी केली. आज शाळा-कॉलेजातून लष्करी शिक्षण सन्मानपूर्वक देण्यात येऊ लागलेले आहे.

"मंत्रबळ नव्हे, यंत्रबळ" हा महामंत्र सावरकरांनी उच्चारला. आपल्या लेखनातून विज्ञानाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. भोळसट धर्मसमजुतींची सावरकरानी चिरफाड करून टाकली. राष्ट्राला प्रखर बुद्धिवादाची शिकवण दिली. यंत्र माणसाचा शत्रू नसून मित्र आहे हे आवर्जून सांगितले. देशाच्या सर्वांगीण विकासाकरता आज राष्ट्राचे नेते विज्ञानाचीच उपासना करू लागलेले आहेत.

सिंध प्रांत मुंबईप्रांतापासून निराळा करण्याच्या योजनेला संमती देऊ नका असे सावरकरांनी जीव तोडून सांगितले. सिंध प्रांताच्या विभक्तीकरणात सावरकरांना पाकिस्तानची बीजे दिसली. सावकरांची नजर तीक्ष्ण होती. सावकरांच्या इषाऱ्याकडे नेत्यांनी दुर्लक्ष केले. त्याचे दुष्परिणाम साऱ्या राष्ट्राला पुढे भोगावे लागले. सावरकरांचा सल्ला मानला गेला असता तर फाळणीचे संकट कदाचित टळले असते. "याल तर तुमच्यासह" या सावरकरांच्या तत्त्वाचा अंगिकार करण्यात आला असता, तर राष्ट्रद्रोह्यांची मुजोरी देशाचे तुकडे करण्याइतकी वाढलीच नसती.

नागालँडसंबंधी सावरकरानी दिलेली धोक्याची सूचना आज खरी ठरली आहे.

सावरकरांनी "सैनिकीकरणा" चा प्रचार सतत केला. विरोधकांनी त्यांना "रिक्रूट" एजंट म्हणूनही हिणवायला कमी केले नाही. पण सावरकरांनी त्याची खंत बाळगली नाही. आपला प्रचार चालूच ठेवला. या सैनिकांतूनच पुढे "आझाद

हिंद फौजे "ची निर्मिती झाली. सावरकरांचे ऋण देशगौरव सुभाषचंद्र बोस यानी उघडपणे मान्य केले.

पाकिस्तानी आक्रमणाचे वेळी "सैनिकीकरणा" चे महत्त्व आमजनतेला पटले. भारत सरकारलाही लष्कराच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागले. सावरकरांच्या सल्ल्याप्रमाणे लक्षावधी खड्या सैन्याची उभारणी आपण केली असती तर चीन आणि पाकिस्तानची भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमतच झाली नसती. फसव्या शांततेच्या मृगजळामागे धावण्यापेक्षा लष्करीदृष्ट्या राष्ट्र मजबूत करण्याचे महत्त्व विचारवतांना आज पटू लागलेले आहे.

"आत्यंतिक अहिंसा हे पाप, सापेक्ष अहिंसा हे पुण्य" ही सावरकरांची बिनचूक आणि व्यवहारी विचारसरणी राष्ट्र-नेत्यांना आता पटू लागली आहे.

पानिपतावर आत्महोम करणारा महाराष्ट्र, हाच भारताचा रक्षणकर्ता होय, भारताचा खड्गहस्त होय हा सावरकरांचा अभिमान सार्थ ठरला आहे. सह्याद्रीचे प्रतिनिधी ना. यशवंत-राव चव्हाण आज हिमालयाच्या संरक्षणाकरता सज्ज आहेत.

सावरकरांनी प्रतिपादलेली तत्त्वे त्यांना विरोध करणारेच प्रत्यक्षात उतरवीत आहेत. हा कालमहिमा आहे. सावरकर देहरुपाने अंतर्धान पावले तरी त्यांचा अमर आत्मा आजही पुकार करीत आहे. "हे सुरसेविनी सिंधू आम्ही तुला कसे विसरू ?"

• समाप्त •

# स्वातंत्र्यवीर सावरकर–जीवनपट

२८ मे १८८३ भगूरगावी जन्म

१८९२ मातोश्रींचे निधन

९ सप्टेंबर १८९९ पितृवियोग.

१ जानेवारी १९०० मित्रमेळ्याची स्थापना.

डिसेंबर १९०१ मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.

मे १९०४ मित्रमेळ्याचे ' अभिनव भारता ' त रूपांतर.

ऑक्टोबर १९०५ परदेशी कापडाची होळी.

जुलै १९०६ इंग्लंडात आगमन.

१ जुलै १९०९ कर्नल वायलीचा मदनलाल धिंग्राकडून वध.

जानेवारी १९१० ' शिखांचा इतिहास ' या ग्रंथाचे लेखन.

८ जुलै १९१० त्रिखंडात गाजलेली उडी.

२३ डिसेंबर १९१० जन्मठेपेची शिक्षा.

३१ जानेवारी १९११ दुसरी जन्मठेपेची सजा.

१९१८ ते १९१९ आजारपण.

६ जानेवारी १९२४ सुटका.

मार्च १९२७ महात्मागांधी व सावरकर भेट.

१९३१ पतितपावन मंदिर अस्पृश्यांना खुले.

मे १९३७ बिनशर्त मुक्तता–हिंदुमहासभेचे अध्यक्षस्थान.

१९३८ साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान.

१९३९ भागानगर सत्याग्रह.

१९४१ भागलपूर सत्याग्रह.

१९४३ साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार.

२० जानेवारी १९४६ हृदयविकाराचा पहिला झटका.

५ फेब्रुवारी १९४८ अटक.

१० फेब्रुवारी १९४९ निर्दोष म्हणून मुक्तता.

४ एप्रिल १९५० स्थानबद्धता.

४ एप्रिल १९५२ अभिनव भारत सांगता समारंभ.

मे १९५७ सत्तावन स्वातंत्र्ययुद्ध शताब्दि—दिल्लीत सत्कार.

१९५८ अमृत महोत्सव.

२६ फेब्रुवारी १९६६ आत्मसमर्पण.

. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नों. दि ...............
IRBK-0111634
IRBK-0111634